दैनिक

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष – ५ वे अंक –३३९ | मंगळवार,दि.१२ ऑगस्ट २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-339 | Tuesday, Dt.12 August 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# गोपीनाथ मुंडेंनाच मुख्यमंत्री करणार होतो : मुख्यमंत्री फडणवीस

## लातूर येथे स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या पुतळ्याचे अनावरण

प्रतिनिधी । लातुर

माझ्यासारखे असंख्य कार्यकर्ते घडवले ते आपल्या सर्वांचे लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या पावनस्मृतींना अभिवादन करतो. मी माझे भाग्य समजतो की, येथील पुतळा अनावरण सोहळा माझ्या हस्ते झाला. स्व. विलासराव देशमुख यांचा पुतळा त्याच ठिकाणी आहे, स्व. गोपीनाथराव मुंडे आणि विलासराव देशमुख यांची मैत्री संपूर्ण राज्याला माहिती आहे. आज त्यांचे पुतळे एकमेकांच्या आजूबाजूस आहेत, हे वेगळेपण आहे असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लातूरमधील पुतळा अनावरण सोहळ्यात भाषणाला सुरुवात केली. आपल्या भाषणात गोपीनाथराव मुंडेंचा संघर्ष आणि आठवणी सांगत २०१४ च्या निवडणुकीवेळचा किस्साही मुख्यमंत्र्यांनी सांगितला. मोदींना उधारीवर मुंडे साहेबांना दिलंय. आम्ही त्यांना परत आणणार आणि मुख्यमंत्रिपदावर बसवणार हे मी





म्हणायचो. पण, दुर्दैवाने ते शक्य होऊ शकले नाही असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी म्हटले.

राज्यात काम केलेले नेते दिल्लीत गेले तर हरवून जातात. मात्र, लोकसभेत अवघ्या काही दिवसांत मुंडेसाहेबांनी त्यांचे काम दाखवले होते. पण, त्यांना तेथे काम करण्याची संधी मिळाली नाही. गोपीनाथराव मुंडेंनीच देशात

(उर्वरीत पान २ वर)

### मला वारस घोषित केले : पंकजा मुंडे

मुंडेसाहेबांनी त्यांच्या जिवंतपणीच मला वारस घोषित केले. त्यामुळे त्या वारशासोबत संघर्ष आणि कारस्थानही माझ्या वाटेला आलं असं वक्तव्य राज्याच्या मंत्री पंकजा मुंडे यांनी केलं. फेकलेले तुकडे घ्यायचे नाहीत, नेहमीच बेरजेचं राजकारण करायचं अशी वडिलांनी शिकवण दिली. माझ्या वडिलांनी त्यांच्या तोंडातून सांगितलं की मी त्यांची वारस आहे. त्यामुळे त्या वारशाला सुईच्या टोकाइतकाही धक्का लागू देणार नाही असे पंकजा मुंडे म्हणाल्या. मुंडे साहेबांच्या वारशासोबत संघर्ष आला, अडचणी आल्या. परंतु आम्ही संस्कारात वागलो, कुणाबद्दलही वाईट विचार केला नाही असे त्या म्हणाल्या.

### हा सर्वांसाठी भावनिक क्षण : मंत्री भोसले

मुंडे साहेबांच्या पुतळ्याचे अनावरण हा सर्वांसाठी भावनिक क्षण आहे. मुंडे साहेबांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेले देवेंद्र फडणवीस, दुस–या बाजूला पंकजाताई आणि धनुभाऊ यांच्या उपस्थितीत हा सोहळा म्हणजे भावनिक क्षण आहे. मी पाहिल्यांदा आमदार झालो तेव्हा मुंडे साहेब सभागृहात यायचे तेव्हा आम्हाला सर्वांना आतुरता असायची. साहेब सभागृहात आलेत ते काय बोलतात हे पाहावं वाटायचं. ज्यांच्या मार्गदर्शनाखाली फडणवीस साहेबांसारखे नेतृत्व झाले, मुंडे साहेब मुख्यमंत्री होऊ शकले नाहीत. पण, त्यांचे शिष्य फडणवीस साहेबांनी हे स्वप्न पूर्ण केले, असे मंत्री भोसले यांनी म्हटले.

# प्रभारी अधिकारी सपोनि राजेश गडवे हे वाळूमाफिया व अवैध धंदयासाठी ठरत आहेत कर्दनकाळ

## वाळूच्या ट्रॅक्टर वर,व देशी दारू विक्रत्यावर कारवाई बारा लाख ३८ हजारांचा मुद्देमाल जप्त

तलवाडा ।प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील चंकलबा पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि राजशे गडवे, व त्यांचे सहकारी उमापुर हद्दीत गस्त घालत असतांना दिं.१० रोजी मौजे गायकवाड जळगाव येथील नदीतून वेळ१७.०० वा वाळू भरून टॅक्टर जळगाव फाटयाकडे जात असल्याची माहिती मिळताच प्रभारी सपोनि राजेश गडवे यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसोबत वाळूच्या टॅक्टर चा पाठलाग करून ट्रॅक्टर पकडला .

यामध्ये सपोनि राजेश गडवे त्यांचे सहकारी पोउपनि पाटील , चालक सुरवसे, पोअं घोंगडे, पोह घनशाम केदार यांनी मोठी कारवाई केली , या कारवाईत विनापरवाना वाळू वाहतूक करणारा टॅक्टर पकडून , पोह घनशाम



केदार यांच्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) नुसार गुन्हा दाखल करून, टॅक्टर वर गुन्हा दाखल करून आकरा लाख नव्वद हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे.सपोनि गडवे यांच्या आदेशाने पुढील तपासासाठी एन .पी.सी गुजर यांच्याकडे देण्यात आला आहे .वाळू माफियांना गडवे यांनी चौथा दणका दिला आहे . गेवराई तालुक्यातील चकलांबा पोलिस ठाण्याचे प्रभारी म्हणून एपीआय राजेश गडवे यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी पदभार घेतच दोन नंबर वाल्यांना दणका दिला आहे,एक पाठोपाठ धडक चार कारवाया करत अवैध वाळू वाहतूक करणारे वाहने पकडून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले असल्याने तालुक्यात या कारवाईचे कौतुक होत

(उर्वरीत पान २ वर)

# भ्रष्टाचारी व कलंकीत मंत्र्यांना न हाकल्यास त्यांना शिवसैनिक रस्त्यावर फिरु देणार नाहीत – जिल्हाप्रमुख गणेश वरेकर

बीड ।प्रतिनिधी

पक्षप्रमुख उद्धव साहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार व शिवसेना सचिव विनायजी राऊत साहेब, संपर्कनेते सुनिलजी प्रभू साहेब, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे साहेब,व संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व शिवसेना जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांच्या नेतृत्वाखाली व माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर व महिला आघाडीच्या जिल्हा संघटिका प्रमिलाताई माळी,तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन, तालुकाप्रमुख विनायक बप्पा मुळे, उपजिल्हाप्रमुख रामराजे निंबाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत आज बीड शहरातील अण्णाभाऊ साठे




चौकात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे बीड जिल्हा पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात आले.

जय भवानी, जय शिवाजी, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा विजय असो, उद्धवसाहेब तुम आगे बढो , कलंकित मंत्री यांची हकालपट्टी झालीच पाहिजे, महाराष्ट्र सरकार हाय हाय अशा गगनभेदी घोषणा शिवसैनिक देत होते यामुळे हा परिसर शिवसेनामय झाला होता.यावेळी सर्व मागण्याचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले. यावेळी बोलताना जिल्हाप्रमुख

(उर्वरीत पान २ वर)

# जिजाऊनगर भागातील मागासवर्गीय वस्तीतील रस्ता नाली आणि पाण्याच्या पाईपलाईनसाठी स्वातंत्र्यदिनी आमरण उपोषणाचा इशारा

बीड ।प्रतिनिधी

बीड शहरातील नवीन वार्ड क्रं.२२ मधील जिजाऊ नगर, जुना धानोरा रोड, नवीन सरस्वती विद्यामंदिर शाळेच्या दक्षिण बाजूस असलेल्या जिजाऊनगर मधील मागासवर्गीय वस्तीमध्ये रस्ता, नाली व पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईनसाठी स्वातंत्रयदिनी १५ ऑगस्ट २०२५ रोजी अमरण उपोषण करण्याचा इशारा परिसरातील नागरिकांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

या संदर्भात म्हटले आहे की, वार्ड क्रमांक २२ जुना वॉर्ड १४




जिजाऊ नगर, जुना धानोरा रोड, नवीन सरस्वती विद्या मंदिर शाळेच्या दक्षिण बाजूस मागासवर्गीयाची कॉलनी गेली २५ वर्षापासून आहेत. या भागात रस्ता, नाली आणि पिण्याच्या पाण्याची पाईप जोडणी झालेली नाही. या मागणीसाठी अनेक वर्षापासून नगर परिषदेस पाठपुरावा करण्यात येत आहे. या भागातील नगरसेवकांकडेही वारंवार पाठपुरावा केला आहे. नगर परिषदेमध्ये सक्रिय असलेल्या पदाधिकाऱ्यांकडे अनेक वेळा पाठपुरावा केलेला आहे.

मागासवर्गीयाच्या वस्त्यांच्या विकासांतर्गत् दलित उत्थान योजनेच्या निधीचा नगर परिषदेने नियमबाह्यरित्या पात्र नसलेल्या भागासाठी वापरला आहे काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे. या भागातील नागरीकांना असेही कळाले आहे की, या भागातील रस्ता, नाली आणि पाईलाईनचे काम कागदावर दाखवून बोगस बिले नगर परिषद प्रशासनाने उचललेले आहेत. याबाबतची उच्चस्तरीय चौकशी समितीमार्फत जिल्हाधिकारी यांनी चौकशी करावी, अशी मागणी या भागातील नागरिकांची केली आहे.

(उर्वरीत पान २ वर)

# टेंभुर्णी अॅट्रॉसिटी प्रकरणातील तीन आरोपींचा जामीन सत्र न्यायालयाने फेटाळला

बीड : टेंभुर्णी ता. शिरूर कासार येथील ट्रॉसिटी अत्याचार प्रकरणातील गजाआड असलेल्या दोन आरोपींचा तसेच एका फरार आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज मा. तदर्थ जिल्हा व सत्र न्यायाधिश बीड ,यांनी फेटाळून एक प्रकारे जातीवाचक शिवीगाळ करून जीवे मारण्याच्या धमकी प्रकरणात न्यायालयाने आरोपींना दणका दिला आहे.

या प्रकरणाबाबत थोडक्यात हकीकत अशी की मौजे टेंभुर्णी ता. शिरूर जि. बीड येथील रहिवासी काकासाहेब मारुती ढगे हे दिनांक १९ जुलै रोजी दुपारी गावातील मारुतीच्या मंदिरामध्ये गप्पा मारत बसले होते त्यावेळी गावातीलच संपत बबन वनवे व त्याचा भाऊ सुनील बबन वनवे हे त्या ठिकाणी आले व सुनील बबन वनवे याने नशेत असताना बाटलीतील पाणी पिऊन पाण्याची गुळणी फिर्यादीचे अंगावर टाकली आणि दोन्ही भावांनी फिर्यादीला जातीवाचक शिवीगाळ करून मारोती मंदिरातून उठून जा असे म्हणून शिवीगाळ केली व जीवे मारण्याची धमकी देऊन सार्वजनिक ठिकाणी फिर्यादीचा अपमान केला या अनुषंगाने



फिर्यादीने शिरूर पोलीस ठाण्यात आरोपींच्या विरुद्ध गु.र.नं .२१२/२०२५ नुसार अनुसूचित जाती अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये तसेच भारतीय न्याय संहिता मधील नवीन कलमानुसार गुन्हा दाखल केला होता, त्या अनुषंगाने शिरूर पोलिसांनी दोन्ही आरोपींना गजाआड केले तब्बल वीस दिवसांहुन अधिक काळ जिल्हा कारागृहात बंद असलेल्या आरोपींनी अखेर त्यांचा जामीन अर्ज जिल्हा व सत्र न्यायालय बीड येथे दाखल केला होता,तसेच याच प्रकरणातील एक अन्य फरार आरोपी भीमा कराड हा स्वतःची अटक टाळून अटकपूर्व जामीन मिळण्यासाठी त्याने जिल्हा न्यायालयात धाव घेतली मात्र या प्रकरणातील सर्व कागदपत्रांचे तसेच फिर्यादीच्या वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरून गजाआड असलेल्या दोन्ही आरोपींचा तसेच

(उर्वरीत पान २ वर)

# तलवारीच्या हल्ल्यात अनेकजण गंभीर जखमी

## वराह चोरीच्या वादातून रस्त्यावरच तुफान राडा; दगडफेक, तलवारीच्या हल्ल्यात अनेकजण गंभीर जखमी

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

मोरेवाडी शिवारात वराह चोरीच्या कुरापतीवरून सुरू झालेल्या वादातून झालेल्या तलवार आणि दगडफेकीत दोन्ही बाजूंनी गंभीर जखमी होण्याचा प्रकार घडला आहे. या घटनेत परस्परविरोधी तक्रारींवरून दोन्ही गटांतील एकूण आठ जणांवर अंबाजोगाई शहर पोलिस ठाण्यात प्राणघातक हल्ला केल्याचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

घटनेविषयी मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी दिनेश लक्ष्मण जाधव (रा. सदर बाजार, अंबाजोगाई) यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, १० ऑगस्ट रोजी दुपारी अडीच वाजता ते व त्यांचे भाऊ भारत जाधव स्विफ्ट डिझायर गाडीतून भावाच्या जोगाईवाडी शिवारातील घरी जात होते. मोरेवाडीतील लाल सटवा मेंडके यांच्या घरासमोरून जात असताना गाडीच्या मागील काचेला जोरात आवाज आला. गाडी थांबविल्यावर लाला भागवत मेंडके, सुजीत उर्फ सुरज सटवा मेंडके, सटवा भागवत मेंडके आणि पवन मेंडके (सर्व रा. मोरेवाडी, अंबाजोगाई) यांनी घेराव घातला. भीतीपोटी तेथून निघून धउच् कॉलेजसमोर गाडी थांबवल्यानंतर आरोपी पुन्हा दोन दुचाक्यांवर आले. त्यांनी 'जनावरे चोरतोस का?' असा सवाल करत तलवारीने भारत जाधव यांच्या डोक्यात वार केला. बचाव करताना दिनेश जाधव यांच्या तळहातावर गंभीर जखम झाली. त्यानंतर दगडफेक करून भावंडांसह युवराज मेंडके, हेमंत जिरंगे यांनाही मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. सदर फिर्यादीवरून लाला मेंडके, सुजीत मेंडके, सटवा मेंडके आणि पवन मेंडके यांच्याविरुद्ध प्राणघातक हल्ल्याचा गुन्हा नोंदवण्यात आला.

दरम्यान, लाला भागवत मेंडके (रा. मोरेवाडी) यांनी दरम्यान, लाला भागवत मेंडके (रा. मोरेवाडी) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्याच दिवशी दुपारी अडीच वाजता भारत जाधव व त्यांचे सहकारी स्विफ्ट डिझायर गाडी थेट त्यांच्या घरासमोर आणून उभी केली. गाडी हटविण्याविषयी विचारणा केली असता 'तुझे डुकरे आम्ही चोरून विकले, काही करु शकत नाहीस' असे म्हणत शिवीगाळ केल्याचा दावा फिर्यादीने केला. त्यानंतर तो, त्याचा भाऊ सटवा व पुतण्या सुरज पोलिस स्टेशनकडे तक्रार करण्यासाठी निघाले असता, धउच् कॉलेजजवळ भारत लक्ष्मण जाधव, दिनेश लक्ष्मण

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!

प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन

दहिवाळ सुवर्णकार

नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777

शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

6 x 6.5

## संपादकीय

# वनतारा की जनतारा ?

कोल्हापूरमधील नांदणीच्या प्रसिद्ध करवीर मठातील महादेवी उर्फ माधुरी हत्तीण गुजरातच्या वनतारा प्रकल्पामध्ये पाठवण्यात आली आहे. याला निमित्त ठरली आहे ती उच्चाधिकार समिती आणि पेटा संस्था! या जनमताची धग महाराष्ट्रभरात पसरली आहे.गेले काही दिवस कोल्हापूरमधील भावनात्मक वातावरण पेटले आहे. त्याला कारणही तसेच आहे. कोल्हापूरमधील नांदणीच्या प्रसिद्ध करवीर मठातील महादेवी उर्फ माधुरी हत्तीण गुजरातच्या वनतारा प्रकल्पामध्ये पाठवण्यात आली आहे. या जनमताची धग महाराष्ट्रभरात पसरली आहे. कोल्हापूरकरांनी आपली लाडकी माधुरी परत आणण्याचा जणू चंगच बांधला आहे. जगात भारी आमची कोल्हापुरी ही कोल्हापूरकरांची खरी ओळख. कोल्हापूरकरांनी एकदा ठरवले की, ते खटका पडल्याशिवाय राहत नाहीत. 'प्राडा' या जगप्रसिद्ध कंपनीने नुकताच कोल्हापुरी चपलेचा दणका अनुभवला आहे. आताही कोल्हापूरसह महाराष्ट्राचे वातावरण ढवळून निघाल्याने ही महादेवी 'जनतारा' बनली आहे. यानिमित्त पुन्हा चर्चेत आला आहे तो गुजरातच्या भावनगरमधील प्रसिद्ध 'वनतारा' प्रकल्प!

'काय' आहे हे महादेवी हत्तीण प्रकरण?

कोल्हापूरमध्ये सन १९५० साली स्थापन झालेला प्रसिद्ध स्वस्तिश्री जिनसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामी संस्थान मठ आहे. करवीर मठ या नावानेही हा मठ प्रसिद्ध आहे. १९९२ पासून महादेवी नावाची हत्तीण ट्रस्टकडे आहे आणि धार्मिक कार्यक्रमांसाठी मठात हत्ती ठेवण्याची धार्मिक परंपरा असल्याचे म्हटले जाते. हत्तीची देखभाल करणे ही ट्रस्टच्या उपक्रमांचा अविभाज्य भाग आहे. या पेटा संस्थेने संस्थानात असणाऱ्या महादेवी उर्फ माधुरीवर अत्याचार होत असल्याची तक्रार उच्चाधिकार समितीकडे केली. या तक्रारीची दखल घेत समितीने २८ डिसेंबर २०२३ रोजी महादेवीला राधे कृष्ण मंदिर हत्ती कल्याण ट्रस्ट (वनतारा)ला सोपवण्याचे आदेश दिले.

करवीर संस्थान उच्च न्यायालयात

महादेवी हत्तीण वनताराला सोपवण्याच्या निर्णयाविरोधात करवीर संस्थानने उच्च न्यायालयात दाद मागितली. यात आपल्याकडे या हत्तीणीची मालकी असून, तिची नोंदणीही आहे. तसेच उच्चाधिकार व वनविभागाचे अधिकारी नियमितपणे मठाला भेट देऊन हत्तीणीची तपासणीही करतात. समितीचा निर्णय एकतर्फी असून, आपण दिलेल्या निवेदनाचा विचार करण्यात आला नाही. यावर न्यायालयाने समितीला पुन्हा चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले.

# चांगली माणसं , चांगल्या संस्था जपण्याची गरज: कॉ.एड.अजय बुरांडे

## दिल्ली येथील स्वतंत्र दिनाच्या कार्यक्रमासाठी कॉ.सुभाष डाके निमंत्रित

माजलगाव / प्रतिनिधी

सहकार क्षेत्राची अवस्था बिकट असताना नवा आदर्श घालत उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल नित्रुड सेवा सहकारी सोसायटी चे चेअरमन कॉम्रेड सुभाष डाके यांची सपत्नीक दिल्ली येथील स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमासाठी निमंत्रित म्हणून निवड करण्यात आली. महाराष्ट्रातून सात आणि बीड जिल्ह्यातील एकमेव या संस्थेची निवड करण्यात आली आहे.त्यानिमित्त त्यांच्या नागरी सत्कार कार्यक्रमानिमित्त माकपचे जिल्हा सचिव कॉ.ड. अजय बुरांडे यांनी चांगली माणसं आणि चांगल्या संस्था जपण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केले.

सहकार क्षेत्राची अवस्था चिंतनीय असताना नित्रुड सेवा सहकारी सोसायटी विविध उपक्रम तसेच,५ कोटी कर्जवाटप,सतत आठ वर्षे १००% कर्जवसुली,४५ लाख नफा मुदत ठेव ठेऊन त्या रक्कमेतुन बाजार गाळ्यांची भव्य इमारत संस्थेने उभी केली. शेतकरी प्रशिक्षण कार्यशाळा, ग्री बिजनेस स्टार्टअप करिता कर्मचारी प्रशिक्षण, महाराष्ट्र शासनाद्वारे सर्व संचालक मंडळाचे प्रशिक्षण, सर्व सभासदांचे प्रशिक्षण,अटल पणन महाभियानांत तत्कालीन सहकार मंत्री सुभाष देशमुख यांच्या हस्ते संस्थेचे चेअरमन आणि सचिव यांचा सत्कार सोलापूर येथे करण्यात आला.३४८८ सभासद संख्या असलेल्या या संस्थेने सर्व कारभार पारदर्शक आणि संगणकीकृत केलेला आहे, शेतकऱ्यासाठी कॉमन सर्विस सेंटर सुरू आहे, विविध निकषांच्या आधारे भारत सरकारने नाबार्ड कडून या संस्थांची निवड केलेली आहे.

यानिमित्ताने चेअरमन कॉ. सुभाष डाके आणि त्यांच्या पत्नी उमादेवी डाके यांचा ग्रामस्थांच्या वतीने कॉम्रेड बुरांडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बोलताना कॉ.बुरांडे म्हणाले की, सरपंच पद आणि चेअरमन पद हे ग्रामीण विकासाच्या जबाबदारीचे पद आहे, त्याचा आदर्श नित्रुड गावात कॉम्रेड दत्ता डाके आणि सुभाष डाके यांनी घालून दिलेला आहे. औषधी वनस्पती प्रमाणे चांगली माणसं आणि चांगल्या संस्था जपण्याची जबाबदारी सर्वांचीच आहे. सत्कारास उत्तर देताना सुभाष अण्णा डाके म्हणाले की हा माझा असून सर्व सोसायटीच्या सभासदांचा सन्मान आहे यावेळी माजी चेअरमन मनोहर डाके, सरपंच आणि माजी चेअरमन दत्ता डाके यांनी सोसायटीच्या विकासाचा इतिहास मांडला. चेअरमन असताना दत्ता डाके यांनी सोसायटीची १००% वसुली व संस्था नफ्यात आणण्याची किमया करून दाखवली. त्यानंतर चेअरमनपदी सुभाष डाके यांची निवड झाल्यानंतर त्यांनी त्यात आणखी भर घातली. यामुळे भारत सरकारने त्यांच्या कार्याची दखल घेतली आहे.

सुत्रसंचलन ड.अशोक डाके आणि प्रास्ताविक रामदिप डाके यांनी केले.या कार्यक्रमासाठी अध्यक्ष सरपंच कॉ.दत्ता डाके, प्रमुख पाहुणे कॉ.ड. अजय बुरांडे , उपसरपंच उत्तमराव जाधव, कॉ.संदिपान तेलगड,जिल्हा मध्यवर्ती बँकेचे माजी उपाध्यक्ष गोरख धुमाळ,






# महापालिकेच्या प्रश्नमंजुषा स्पर्धेत सावित्रीबाई फुले विद्यालय प्रथम

परभणी ।प्रतिनिधी

परभणी शहर महानगरपालिकेच्या हर घर तिरंगा मोहिमेअंतर्गत आयोजित विविध स्पर्धांपैकी प्रश्नमंजुषा स्पर्धा बि. रघुनाथ सभागृहात उत्साहात पार पडली. उद्घाटन सहायक आयुक्त आवेज हाश्मी, जुबेर हाश्मी, आस्थापना विभाग प्रमुख शिवाजी सरनाईक आणि क्रीडा अधिकारी राजकुमार जाधव यांच्या हस्ते झाले.स्वातंत्र्यापूर्वीचा व नंतरचा भारत या विषयावर आधारित प्रश्नमंजुषेत शाळा व महाविद्यालय अशा १७ स्पर्धकांनी सहभाग घेतला. एक महाविद्यालयाचा व तीन शाळांचे असे चार गट तयार करण्यात आले होते. स्पर्धा चार फेऱ्यांमध्ये घेण्यात आली.स्पर्धेत सावित्रीबाई फुले विद्यालयाच्या विद्यार्थीनींनी प्रथम क्रमांक, बाल विद्यामंदीर शाळेच्या विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांक, तर शिवाजी कॉलेजच्या विद्यार्थिनींनी तृतीय क्रमांक पटकावला. आदर्श विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी देखील स्पर्धेत सहभाग नोंदविला.या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रशिक्षक यशवंत मकरंद, मनिषा उमरीकर आणि विश्वजीत वाघमारे उपस्थित होते. विजेत्या सर्व स्पर्धकांना आयुक्त धैर्यशील जाधव, उपायुक्त बबन गं. तडवी आणि सहायक आयुक्त प्रज्ञावंत कांबळे यांनी शुभेच्छा

# मुखेड शहर बाह्यवळण रस्त्यास केंद्रीय मंजुरी; वाहतुकीची कोंडी सुटणार

**आ. डॉ. तुषार राठोड यांच्या पाठपुराव्याला यश**



मुखेड ।प्रतिनिधी

नांदेड-मुखेड-बिदर या दोन तीर्थक्षेत्रांना व दोन राज्यांना जोडणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६१(अ) वर मुखेड शहराजवळ बाह्यवळण रस्ता करण्यास केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांनी तत्त्वतः मंजुरी दिली आहे. या रस्त्याच्या सर्वेक्षणासाठीच्या निविदा प्रक्रियेसही मंजुरी मिळाली असून, आवश्यक आर्थिक तरतूदही करण्यात आल्याची माहिती आमदार डॉ. तुषार राठोड यांनी दिली.

मुखेड शहरातून राष्ट्रीय महामार्ग गेल्याने वाढती वाहतूक आणि संभाव्य कोंडीचा प्रश्न गंभीर झाला होता. यावर तोडगा काढण्यासाठी बाह्यवळण रस्त्याची गरज असल्याचे आमदार राठोड यांनी सातत्याने गडकरी यांचे लक्ष वेधले. परिणामी, केंद्रीय रस्ते विकास मंत्रालयाने मंजुरी देत सर्वेक्षणासाठी पावले उचलली आहेत.या रस्त्यामुळे शहरातील वाहतुकीचा ताण कमी होणार असून औद्योगिक व लघुउद्योग क्षेत्रालाही चालना मिळणार आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सर्वेक्षणाचे प्रत्यक्ष काम सुरू होईल, असेही आमदार राठोड यांनी सांगितले.

# पूर्णा पाटबंधारे खात्याद्वारे नदीकाठावरील ग्रामस्थांना सतर्कतेचा इशारा

: येलदरी जलाशयातील पाणीसाठ्यात ८९ टक्क्यांपर्यंत वाढ ; कोणत्याही क्षणी पूर्णा नदीपात्रात पाण्याचा विसर्ग

परभणी (प्रतिनिधी)

खडकपूर्णा प्रकल्पातून २ गेटद्वारे पूर्णा नदीच्या पात्रात पाण्याचा मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरु करण्यात आला असून त्यामुळे येलदरी जलाशयाच्या पाणलोट क्षेत्रातून येलदरीत मोठ्या प्रमाणावर पाण्याची आवक सुरु आहे. सोमवारी सकाळी या जलाशयात ८९.७४ टक्के पाणीसाठा उपलब्ध झाला. त्यामुळे नदीपात्रातील पाण्याची आवक ओळखून पाटबंधारे खात्याद्वारे येथून पुढे केंव्हाही येलदरी येथील जलविद्युत केंद्रातील टर्माइनला व नदीपात्रातसुध्दा पाण्याचा विसर्ग केला जाईल, असे जाहीर केले आहे.

दरम्यान, नदीपात्रावरील शेतकर्यांनी आपआपले नदीपात्रातील साहित्य किंवा जनावरे हटवावीत, असे निर्देश दिले आहेत. दरम्यान, पूर्णा पाटबंधारे प्रकल्पाच्या येलदरी जलाशयात सोमवारी ११ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजेपर्यंत ८९.७४ टक्के एवढा जिवंत पाणीसाठा उपलब्ध होता. या प्रकल्पाची एकूण साठवण क्षमता ९३४.४४० दलघमी असून यामध्ये १२४.६७० दलघमी हा मृत साठा आहे, तर ८०९.७७० दलघमी जिवंत साठा मानला जातो. सद्यस्थितीत धरणात ७२६.६७५ दलघमी जिवंत तर १२४.६७० मृत पाणीसाठा असून एकूण पाणीसाठा ८५१.३४५ दलघमी इतका झाला आहे. जलाशयातील पाणी पातळी ४६०.९५० मीटर झाली आहे. यामुळे येलदरी धरण सध्या ८९.७४ टक्के क्षमतेने भरलेले आहे. गेल्या २४ तासांमध्ये धरणात १३.२५७/३३५.६२० दलघमी पाण्याची आवक झाली.

# वातावरणातील बदलामुळे मानवी आरोग्यावर वाढते दुष्परिणाम

मंठा ।प्रतिनिधी

अलीकडील हवामानातील अनियमितता – कधी ऊन, कधी मुसळधार पाऊस, वाढती आद्रता आणि उकाडा – यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा समतोल बिघडत आहे. मंठा शहरासह ग्रामीण भागात सर्दी, खोकला, घसा बसणे, अंगदुखी यांसारखे आजार मोठ्या प्रमाणावर वाढले असून लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत अनेकजण आजारी पडले आहेत. परिणामी दवाखाने रुग्णांनी हाऊसफुल झाले आहेत.

आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार डेंग्यू, मलेरिया यांसारख्या डासजन्य आजारांचे प्रमाणही झपाट्याने वाढले आहे. अनियमित पावसामुळे साचलेल्या पाण्यात व गवताच्या वाढलेल्या प्रमाणात मच्छरांचीअवाढ होत आहे. त्यातच ढगाळ वातावरण व उकाड्यामुळे व्हायरल फिव्हर, श्वसनसंसर्ग आणि टायफॉईडसारखे आजार बळावले आहेत. रुग्णांमध्ये ताप, अंगदुखी, पुरळ, अंग खाजवणे, डोकेदुखी, मळमळ अशी लक्षणे प्रकर्षाने दिसत आहेत. साथीचा फैलाव रोखण्यासाठी धूरफवारणी, स्वच्छता मोहिमा, रुग्ण सर्वेक्षण यांसारख्या उपाययोजना प्रभावीपणे राबविण्याची गरज आहे. मात्र, नागरिकांच्या मते नगरपंचायत, ग्रामपंचायत आणि तालुका आरोग्य विभागाकडून यामध्ये अपेक्षित तत्परता दिसून येत नाही.

या परिस्थितीचा गैरफायदा घेत काही खाजगी रुग्णालये व लॅबचालक यांनी तपासण्यांच्या नावाखाली रुग्णांना आर्थिक फटका देण्यास सुरुवात केली असल्याचे जनतेतून बोलले जात आहे. शासनाकडून योग्य नियंत्रण व ठोस कारवाईची मागणी नागरिकांमधून होत आहे, जेणेकरून वाढत्या आजाराबरोबरच आर्थिक लूटही रोखली जाईल.

## पान १ वरून...

**गोपीनाथ मुंडेंनाच मुख्यमंत्री....**

नरेंद्र, राज्यात देवेंद्र असा उल्लेख केला होता. मात्र, सत्ता आल्यावर आम्ही त्यांनाच मुख्यमंत्री करणार होतो. मोदींना उधारीवर मुंडे साहेबांना दिलंय. आम्ही त्यांना परत आणणार आणि मुख्यमंत्रिपदावर बसवणार हे मी म्हणायचो. पण, दुर्दैवाने ते शक्य होऊ शकले नाही असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी म्हटले.

आपण थोर पुरुषांचा पुतळा का बांधतो तर, त्यांच्या दाखवलेल्या मार्गांवर चालण्यासाठी प्रेरणा मिळाली पाहिजे म्हणून. वर्षानुवर्षे मराठवाड्याला तहानलेला ठेवायचं काम हे आधीच्या सरकारने केले. पण, आपण सत्तेत आल्यानंतर बीडपर्यंत आता पाणी पोहोचलेलं आहे. मराठवाडा दुष्काळमुक्त करण्याचे मुंडे साहेबांचे स्वप्न आम्ही पूर्ण करणार आहोत. मराठवाड्याच्या हक्काचे पाणी पळवून नेण्यात आले होते, ते आपण वापस घेतले. गोदावरी परिक्रमाही गोपीनाथ मुंडेंनी केली होती. आता, त्यांचे स्वप्न आम्ही पूर्ण करणार आहोत. रेल्वेचेही काम सुरू आहे. एक-एक करून मुंडे साहेबांचे जी स्वप्नं आहेत ती आम्ही पूर्ण करू . रेणापूर हा आता लातूर ग्रामीण झालाय, त्यामुळे तुमची सेवा म्हणजे मुंडे साहेबांची सेवा आहे. लातूरची पाणीपुरवठा योजना आणि सामान्य रुग्णालय यांना आजच मी मान्यता देतो, अशी घोषणाच मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली.

संघर्ष पाचवीला पूजलेला : धनंजय मुंडे

माजी मंत्री आणि आमदार धनंजय मुंडेंनी आपल्या भाषणातून त्यांचा संघर्ष सांगितला, तसेच आमच्या परळी मतदारसंघाकडे लक्ष द्यावे, अशी विनंती देखील मुख्यमंत्र्यांना केली. मुंडे साहेबांना संघर्ष पाचवीला पुजलेला, तसा आमच्या कुटुंबालाच संघर्ष पाचवीला पूजलेला असल्याचं धनंजय मुंडेंनी म्हटलं.

मुंडेसाहेबांना संघर्ष पाचवीला पूजलेला, तसाच आमच्या कुटुंबाच्या वाटेलाही संघर्ष पूजलेला आहे, पण मी सावलीसारखं, अगदी पहिल्या संघर्ष यात्रेपासूनचा हा संघर्ष पाहिलेला आहे, असे म्हणत आमदार धनंजय मुंडेंनी आपल्या भाषणाची सुरुवात केली.

जयकुमार गोरेंचा टोला..

मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस हे कामं करतायत, अनेकजण स्वत:ला जाणते राजे म्हणवतात. पण ख-या अर्थाने लोकांची सेवा करणारा हा मुख्यमंत्री आहे, देवेंद्र फडणवीस. लोकांच्या विकासाचा गाडा पुढे नेणारा मुख्यमंत्री म्हणजे फडणवीस साहेब, अशा नेत्याच्या हस्ते आज मुंडे साहेबांच्या पुतळ्याचे लोकार्पण होतेय, असे म्हणत मंत्री जयकुमार गोरे यांनी मुख्यमंत्र्यांचं कौतुक केलं. तर, शिवेंद्रराजे भोसले यांनीही फडणवीसांच्या कार्याचं कौतुक केलं.

**भ्रष्टाचारी व कलंकीत मंत्र्यांना ....**

गणेशभाऊ वरेकर, माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर, तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांनी सांगितले की, हे महाराष्ट्रातील सरकार वोटिंग मशीनमध्ये घोळ करून, मतदारांना विविध आमिष दाखवून भ्रष्टनितिने सत्तेवर बसलेले आहे , मंत्रिमंडळात ज्यांना घेतले आहे,त्यांची वागणूक उभ्या महाराष्ट्राने बघितले आहे, चड्डी बनियानवर विधान भवनातील सवयंपाक करणार्या कर्मचाऱ्यांना मारहाण करणे, विधानभवनात मंत्र्यांनी रम्मी खेळणे , सिगारेट ओढणे हे काय चाललंय किती माज चढलाय या मंत्रायाला , दिवसाढवळ्या महाराष्ट्रात खुश पांढले जातात , महिलांवर बलात्कार होत आहेत कुठे नेऊन ठेवलाय महाराष्ट्र हे बंद न झाल्यास यापुढे उद्धव साहेब यांच्या आदेशानुसार शिवसैनिक यांना रसत्यावर फिरु देणार नाहीत असे त्यांनी सांगितले या आंदोलनाला उपतालुकाप्रमुख रामनारायण जाधव, जिल्हा सहसचिव श्रीकृष्ण गायके,तालुका संघटक कलिम शेख ,तालुकसहसचिव संदिप भानप, युवा नेते मुकेश घुमरे, सर्कल प्रमुख अशोक खांडे,उपतालुकाप्रमुख अशोक सगळे , ज्ञानेश्वर सिंघन, रामा जाधव, बाळासाहेब वरेकर,

## पान १ वरून...

विनोद कुटे ,आदेश कुटे ,बाबु कुटे, गोरख नरनाळे,इस्माईल शेख, शेख इरफान, भिमराव तबके ,भरत खरात,विशाल शिंदे, ओमकार गोरे ,बाळु वैध ,करणं लांडगे यांच्यासह पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**प्रभारी अधिकारी सपोनि .....**

आहे.पदभार घेतच धडक कारवाईला सुरुवात करून सपोनि राजेश गडवे यांनी आपल्या कार्याची तत्परता दाखवून दिली.दिनांक १० रोजी पेट्रोलिंग दरम्यान गायकवाड जळगाव या गावात अवैध वाळू वाहतूक करणारा ट्रॅक्टर दिसताच पोलिसांनी जळगाव येथील सरकारी दवाखान्याजवळ टॅक्टर पकडला, तसचे दिं.१० रोजी सायंकाळी उमापुर फाट्यावर अवैधरित्या देशी दारू विक्री होत असल्याची गोपनीय माहिती मिळताच सपोनि राजेश गडवे सह कर्मचाऱ्यांनी छापा मारला असता चार हजार आठशे रुपयांची देशी दारू मुद्देमाल जप्त करून व आरोपी ताब्यात घेण्यात आला आहे, महाराष्ट्र दारू बंदी कायदेप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला ही कार्यवाही केल्याने वाळू माफियांना,व अवैध धंदे वाल्यांना चांगलाच दणका बसला असून एपीआय राजेश गडवे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेल्या कारवाईचे कौतुक चकलांबा ग्रामस्थांकडून होत आहे.

**टेंभुर्णी अॅट्रॉसिटी ...**

अटकपूर्व जामीन मागितलेल्या एका आरोपीचा जामीन अर्ज मा. न्यायालयाने आज फेटाळला आहे, त्यामुळे जातीवाचक शिवीगाळ करून समाजात तेढ निर्माण करणाऱ्या मनोवृत्तीला एक प्रकारे न्यायालयाने मोठा दणका दिल्याचे बोलले जात आहे.

या प्रकरणात फिर्यादी पक्षातर्फे बीड येथील ज्येष्ठविधीज्ञ ड. अनिल बारगजे यांनी भक्कम बाजू न्यायालयासमोर मांडली तसेच कागदपत्रांचे पुरावे न्यायालयाच्या समक्ष सादर करून आरोपींनी कशाप्रकारे फिर्यादीला जातीवाचक शिवीगाळ करून अपमान केला व जीवे मारण्याची धमकी दिली या बाबतचा योग्य युक्तिवाद केला , याबरोबरच फिर्यादीच्या वतीने अति.जिल्हा सरकारी विधीज्ञ ड. अजय तांदळे ,ड.आमेर काझी साहेब,बीड यांनी देखील भक्कम बाजू मांडली.व आरोपींचा जामीन फेटाळल्या कामी मोलाची कामगिरी बजावली,त्यामुळे त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

**जिजाऊनगर भागातील मागासवर्गीय....**

दि. १४ ऑगस्ट पर्यंत या भागातील रस्ता,नाली आणि पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन जोडणीचे काम सुरू करावे, यासाठी जिल्हाधिकारी,बीड, मुख्याधिकारी नगर परिषद, बीड यांना दि.१६/०१/२०२५ रोजी निवेदन देवून मागणी करण्यात आलेली आहे. परंतु प्रशासनाने अद्यापपर्यंत मागणीकडे अक्षम्य दुर्लक्ष केलेले आहे. त्यामुळे स्वातंत्रदिनी दि.१५ ऑगस्ट रोजी या भागातील नागरीकांना अमरण उपोषण करण्याची वेळ आलेली आहे. ही बाब अत्यंत दुर्देवी आहे.

त्यामुळे भारतीय स्वातंत्र्यदिनी या भागातील मोठया संख्येने नागरीक, महिला, जेष्ठ नागरीक आणि लहान मुले यासह सर्व कुटूंबासह जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणास करणार आहेत. यामध्ये वृध्द नागरिक, लहान बालके, महिला यांना काही त्रास झाल्यास किंवा त्यांच्या जीवाला काही धोका निर्माण झाल्यास त्यास सर्व संबंधीत प्रशासन जबाबदार राहील यांची नोंद घ्यावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दि.१५ ऑगस्ट २०२५ रोजी आमरण उपोषणास मोठया संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन या भागातील नागरिकांनी केले आहे.निवेदनावर चोपडे गौतम, वाघमारे विलास, सुहन गायकवाड, श्री.राहुल जाधव, श्री.अनिली खळगे, वसंत सरवदे, जगताप मोहनराव, वीर शरद, बाळासाहेब वाघमारे,दिपक सरवदे यासह परिसरातील इत्तर नागरीकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



# पाण्याची बचत म्हणजे भविष्यातील समृद्धी

## जलनायक मयंक गांधी यांच्या उपस्थितीत साळेगावातील महिला-पुरुषांनी गिरवले भविष्यातील शाश्वत विकासाचे धडे

परळी (प्रतिनिधी)

जलनायक मयंक गांधी संस्थापित ग्लोबल विकास या संस्थे अंतर्गत चालणाऱ्या सिरसाळा येथे सोमवारी विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. माजलगाव तालुक्यातील साळेगाव येथील १३९ महिला आणि पुरुषांनी पाण्याची बचत, जलसंधारण, पाणी व्यवस्थापन, शाश्वत उत्पन्न वाढीसाठी आधुनिक शेती, फळबाग लागवड तंत्र आदींचे त्यांनी धडे घेतले. ग्लोबल विकास ट्रस्टकडून या गावाला आगामी काळात सुधारणांच्या दृष्टीने आवश्यक अशी कामे आणि मदत करण्यात येणार आहे. त्यादृष्टीने गावातील प्रत्येक नागरिक त्या कामाशी अवगत होऊन एकरूप झाला पाहिजे. सोमवारी झालेल्या कार्यक्रमास जलनायक मयंक गांधी यांचीही उपस्थिती होती. त्यांनी उपस्थित सर्वांना मार्गदर्शन केले.

पाण्याची बचत म्हणजे भविष्यातील समृद्धी या विचारांना अनुसरून साळेगाव गावातील १३९ महिला व पुरुष शेतकऱ्यांनी कृषिकूल, सिरसाळा येथे एकदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमात उत्साहाने सहभाग नोंदवला. जलनायक मयंक गांधी यांच्यासह ग्लोबल विकास ट्रस्टच्या प्रशिक्षक टीमकडून जलसंधारण, पाणलोट व्यवस्थापन, जलबचततंत्र, फळबाग लागवड आणि उत्पादनवाढीच्या आधुनिक पद्धती याबाबत त्यांना सखोल मार्गदर्शन मिळाले. तसेच पाणलोट व्यवस्थापन कक्ष, कृषी यांत्रिकीकरण कक्ष, ग्लोबल विकास ट्रस्ट प्रवास कक्ष, कीटक संगोपन गृह आणि माती प्रयोगशाळा यांची प्रत्यक्ष पाहणी करून शेतकऱ्यांना आधुनिक शेतीतील नव्या तंत्रज्ञानाची ओळख झाली. हा कार्यक्रम शेतकऱ्यांच्या शाश्वत शेती प्रवासातील एक प्रेरणादायी पाऊल ठरला.

# आष्टी येथील हंबर्डे महाविद्यालयात राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

आष्टी (प्रतिनिधी)

सालाबाद प्रमाणे याहीवर्षी सोमवार, दिनांक १८ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वाजता आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित ड. बी. डी. हंबर्डे महाविद्यालयात राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धा परीक्षा संधी की संघर्ष, न्याय पालिकेचे स्वातंत्र्य व राजकीय हस्तक्षेप, कृषी तंत्रज्ञानात कृत्रिम बुद्धिमत्तेचे योगदान हे तीन वक्तृत्व स्पर्धेचे विषय आहेत.

प्रथम, द्वितीय, तृतीय पारितोषिकाच्या स्वरूपात अनुक्रमे ५००१ रुपये, ३००१ रुपये, २००१ रुपये व प्रमाणपत्र आणि सन्मान चिन्ह प्रदान करण्यात येणार असून संस्थाध्यक्ष किशोर नाना हंबर्डे, अतुल शेठ मेहेर,



दिलीप शेठ वर्धमाने सर्व मान्यवर संचालक मंडळ तसेच प्राचार्य डॉ. सोपानराव निंबोरे यांच्या मार्गदर्शनाखाली संयोजक समितीच्या वतीने उपप्राचार्य डॉ. बाबासाहेब मुटकुळे, उपप्राचार्य अविनाश कंदले, डॉ. रवी सातभाई, डॉ. अभय शिंदे, प्रा. जैनुल्ला खान पठाण, डॉ. रमेश भारुडकर, डॉ. संतोष वनगुजरे, प्रा. विजय अग्रवाल, डॉ. राजाराम सोनटक्के, प्रा. चंद्रकांत कोकणे, विशाल वर्धमाने, प्रा. रवींद्र डोंगरे विद्यार्थी संसद व सांस्कृतिक मंडळ हे परिश्रम घेत आहेत. ही स्पर्धा महाराष्ट्रातील सर्व कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी खुली राहील. स्पर्धकांनी आपले विचार फक्त मराठी भाषेतच मांडावेत. प्रत्येक स्पर्धकाला पाच मिनिटे वेळ मिळेल. स्पर्धेसंबंधी परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील असे संयोजक समितीच्या वतीने सांगण्यात आले आहे. जास्तीत जास्त स्पर्धकांनी या वक्तृत्व स्पर्धेत भाग घ्यावा असे प्राचार्य डॉ. सोपानराव निंबोरे यांनी आवाहन केले आहे.

# वृक्षारोपण करून पर्यावरणाचे रक्षण करावे – सरपंच सौ.वंदना परिवंत गायकवाड

आष्टी (प्रतिनिधी)

पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने आपले क-हेवडगाव, हरित क-हेवडगाव या संकल्पनेतून वृक्षलागवड मोहिमेचा शुभारंभ क-हेवडगाव गावातील शाळा परिसर, रस्ते, वस्त्या व परिसरात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या उपक्रमाचा शुभारंभ सरपंच तथा कडा कृ. उ. बा. समितीच्या संचालिका सौ. वंदना परिवंत गायकवाड यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.

कार्यक्रमात सरपंच सौ. वंदना गायकवाड, भगवाननाना सांगळे यांनी स्वतः झाडे लावून मोहिमेत सहभाग नोंदवला. यावेळी जालिंदर खांडवे, अर्जुन बांगर, प्रवीण गायकवाड, प्रशांत बांगर, सलवार शेख, महेश सांगळे, शरद खांडवे, किरण गायकवाड, गणेश टकले, संजय गायकवाड, मल्हारी नागरगोजे, श्रीम. उर्मिला नागरगोजे, श्रीम. सुवर्णा गावडे, शिक्षीका श्रीम. रंजना सांगळे, मुख्याध्यापक बापु जायभाय सर, सरोदे सर, क-हेवडगाव येथील बचत गटातील महिला, युवक मंडळे, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत



कर्मचारी, ज्येष्ठ नागरिक व क-हेवडगाव येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी सरपंच सौ. वंदना गायकवाड म्हणाल्या की, प्रत्येकाने किमान एक तरी झाड लावून त्याचे संगोपन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. वृक्षारोपण करून पर्यावरणाचे रक्षण करावे असे प्रतिपादन सरपंच सौ. वंदना परिवंत गायकवाड यांनी केले. हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र या संकल्पनेतून वृक्ष लागवड मोहीम राबविण्यात येत असुन क-हेवडगाव येथील गावातील शाळा परिसर, ग्रामपंचायत हद्द, रस्त्याच्या कडेला, मंदिर परिसरात आणि इतर निवडक ठिकाणी अनेक प्रजातींची झाडे लावण्यात आली.

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि पुढच्या पिढ्यांसाठी हिरवे स्वप्न घडवण्यासाठी अशा उपक्रमांची गरज आहे. प्रत्येक नागरिकाने एक तरी झाड लावून त्याचे संगोपन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. या उपक्रमास सरपंच सौ. वंदना गायकवाड, ग्रामविकास अधिकारी श्रीम. दिपाली गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. झाडे लावा, झाडे जगवा हा संदेश घेऊन मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करण्यात आली.




**वैद्यनाथ बँक – समाजसेवक मा. श्री. विजयकुमार गोल्हार साहेबांनी जि. प. माध्यमिक शाळा मुलांची आष्टी, ता. आष्टी, जि. बीड येथील मतदान केंद्र क्रमांक ६६ वर आपल्या मतदानाचा हक्क बजावला.**

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिंचोटी येथे रक्षाबंधन साजरा

वडवणी (प्रतिनिधी)

चिंचोटी – जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिंचोटी येथे आज आनंद आणि उत्साहात रक्षाबंधनाचा कार्यक्रम पार पडला. भावंडांच्या प्रेम, जिव्हाळा आणि स्नेहाचे प्रतीक असलेला हा सण विद्यार्थ्यांनी उत्साहाने साजरा केला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला लहानग्या बहिणींनी भावांच्या मनगटावर राखी बांधून त्यांच्यावर अक्षता टाकली व दीर्घायुष्याच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी मुलांनीही बहिणींना प्रेमाचे आणि रक्षणाचे आश्वासन दिले. विद्यार्थ्यांनी रक्षाबंधनावरील कविता, गाणी आणि छोटेखानी भाषणे सादर करून सणाचा आनंद द्विगुणित केला.शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक उपस्थित राहून विद्यार्थ्यांना सणाचे सांस्कृतिक आणि सामाजिक महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाच्या शेवटी मिठाई व अल्पोपहार वाटप करून सर्वांनी एकमेकांना सणाच्या शुभेच्छा दिल्या.



# नुमान अली चाऊस यांची अँटी करप्शन फाउंडेशनच्या बीड जिल्हा अध्यक्षपदी निवड

केंद्र सरकार मान्यता प्राप्त अँटी करप्शन फाउंडेशन ही संस्था देशभरात भ्रष्टाचार-लाचखोरी कमी करण्यासाठी कार्यरत आहे. या फाउंडेशनच्या माध्यमातून अनेक सामान्य लोकांची व गरजूंची लाच न देता कामे झालेली आहेत. या फाउंडेशनच्या बीड जिल्हा कार्यकारिणी सदस्य असताना नुमान अली चाऊस यांनी समाज भ्रष्टाचार व लाचमुक्त करण्यासाठी अनेक प्रयत्न केले. ही कामगिरी बघून अँटी करप्शन फाउंडेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष संजीव शर्मा यांनी नुमान अली चाऊस



यांना बीड जिल्ह्याच्या अध्यक्षपदी नियुक्त केले आहे.



# विनायकराव मेटे साहेब यांच्या पुण्यतिथी निमित्त शासकीय रुग्णालयात डॉक्टर आणि रुग्णांना सर्जिकल गाऊनचे वाटप

बीड ।प्रतिनिधी

लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांचे दि.१४ ऑगस्ट रोजी पुण्यस्मरण आहे. त्यानिमित्त शिवसंग्राम विद्यार्थी आघाडीने सामाजिक उपक्रम राबविण्याचे ठरवले आहे. यावेळी बीड येथील शासकीय रुग्णालयात डॉक्टर आणि रुग्णांना सर्जिकल गाऊनचे वाटप करण्यात आले आहे. या प्रसंगी शिवसंग्राम विद्यार्थी आघाडीचे कार्याध्यक्ष मनीष सुहास पाटील, अमोल नवले, अनिकेत साळवे, उत्कर्ष कुलकर्णी, विक्की गिरी आदी उपस्थित होते. लोकनेते विनायक मेटे यांची पुण्यतिथी विविध समाज उपयोगी उपक्रमांनी साजरा व्हावी. त्यांच्या विचारांचा वसा आणि वारसा पुढे घेऊन जात डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांच्या सूचनेनुसार पुण्यतिथी निमित्त मेटे साहेबांना अभिप्रेत सामाजिक उपक्रम राबत त्यांच्या स्मृतिदिनी सामाजिक उपक्रम राबवत त्यांना अनोख्या पद्धतीने श्रद्धांजली अर्पण करण्याचा मानस शिवसंग्राम विद्यार्थी आघाडीने घेतला याचाच भाग म्हणून शासकीय रुग्णालयात डॉक्टर आणि रुग्णांना सर्जिकल गाऊनचे वाटप करण्यात आले आहे.

# शिक्षणाचा उपयोग करून मोक्याच्या जागा मिळवा, त्या पदाचा उपयोग समाजाचे ऋण फेडण्याकरता करा - पूज्य भिक्खु धम्मशील थेरो

श्रावण पौर्णिमा धम्मदेशना संपन्न

बीड ।प्रतिनिधी

प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्था बीड महाविहार धम्मभूमी भदंत आनंद कौसल्यन नगर मौजे शिवनी ता जि बीड येथे दर पौर्णिमेला धम्मदेशनेचे आयोजन करून आचरणशील परंपरा निर्मितीसाठी पौर्णिमेचे महत्त्व जनसामान्यां पर्यंत पोहोचवण्याकरिता बौद्ध संस्कृती जतनच नव्हे तर तिचे संवर्धन करण्याकरिता प्रयत्नशील आहे. श्रावण पौर्णिमे महोत्सवच्या धम्मदेशने प्रसंगी शिक्षणाचा उपयोग करून मोक्याच्या जागा मिळवा त्या पदाचा उपयोग समाजाचे ऋण फेडण्याकरता करा असा बहुमोल उपदेश पूज्य भिक्खु धम्मशील थेरो यांनी केला. धम्मदेशना कार्यक्रमास पूज्य भंते बुद्ध बोधी शिवणी यांची उपस्थिती होती. धम्मदेशनेप्रसंगी प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे, बहुसंख्य सदस्य उपासक -उपासिकांची उपस्थिती होती. सर्वप्रथम संघाच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुष्पदीप धुपाने पूजन करून त्रिवार वंदन करून भिक्खु संघाकडून उपस्थिततांनी त्रिसरण, पंचशील ग्रहण केले. प्रमुख अतिथी इंजि. राजेंद्र घोडके वरिष्ठ अरेखक, सां.भा. विभाग लातूर,भोसले डी.जी. ग्राम विकास अधिकारी शिवणी, यांचा संस्थेतर्फे सत्कार करून संस्थेच्या प्रगती करीत



करीत असलेल्या भरगोष सहाय्याबद्दल आभार मानण्यात आले. तसेच मनीषा अविनाश गंडले पदोन्नती, (सहाय्यक संचालक अभियोग संचालनालय महाराष्ट्र), कु सोनिया अविनाश गंडले ( नवनियुक्त प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी व दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर ) तसेच प्रा.सुशीलकुमार सांगवीकर केएसके कॉलेज बीड, प्रिया प्रकाश खंदारे, यांची विद्युत सहाय्यक पदी निवड झाल्याबद्दल संस्थेतर्फे मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सत्कारास उत्तर देताना प्रत्येकाने आपल्या आई-वडिलांनी शिक्षणाकरता घेतलेल्या कष्टाचे ऋण व्यक्त केले व पालकांनी दाखवलेल्या विश्वासाला तडा न जाऊ देता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेल्या समाजऋण फेडण्याच्या बहुमोल उपदेशानुसार सतत प्रयत्नशील राहण्याचे ठोस आश्वासन दिले. स्पर्धेत यश मिळवण्याकरता जिद्द,अभ्यासातील सातत्य, बाबासाहेबांनी घेतलेल्या कष्टाची जाण सतत डोळ्यासमोर ठेवली तर यश नक्की मिळते असे स्पष्ट केले.

पूज्य भिक्खु धम्मशील थेरो आपल्या श्रवणीय धम्मदेशनेत पुढे म्हणाले की मानव जीवन हे दुर्मिळ आहे, जो जो मानव तथागतांच्या मार्गाने जाऊन आपले जीवन जगेल त्याच्या जीवनात सुख प्राप्त होते व तो दुःख मुक्त होतो, हे महाभयंकर डाकू अंगुलीमालाच्या जीवनात तथागताच्या उपदेशाने कसा बदल झाला व अनेकांची हत्या करण्यासारख्या महाभयंकर कृत्यापासून तो दूर झाला व जीवनात अरहंत पदापर्यंत कसा पोहोचला ते अनेक उदाहरणाद्वारे स्पष्ट करून सांगितले. पूज्य भंतेंनी स्पष्ट केले की तथागतांचे अत्त दीप भव हे समजावून घेऊन आपली प्रगती ही आपल्याच हातात असते,ती प्रगती कशी करावयाची हे महापुरुषांच्या जीवनगाथा सतत डोळ्यासमोर ठेवून वेळेचे नियोजन करणे व माता रमाई, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीमाई, रामजी बाबा सर्व महापुरुषांच्या कष्टाची सतत आठवण ठेवून आपल्या जीवनाची वाटचाल ठेवून त्रिसरण,पंचशील,आर्य अष्टांगिकमार्ग, दहा पारमिता समजावून घेऊन कशी आपली जीवनचर्या ठेवणे हा दुःखमुक्तीचा मार्ग कसा आहे हे अनेक उदाहरणाद्वारे समजावून सांगितले. धम्म हॉल येथे टाचणी पडली तरी आवाज येईल अशी एवढी शांतता होती प्रत्येक जण तल्लीन होऊन एक चित्ताने धम्मदेशनीचा लाभ घेत होते. कुसुम शंकरराव गायकवाड यांच्यातर्फे भोजनदान, धम्मदिना महिला मंडळ ताडसोणा यांच्याकडून खीर दान करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन परमेश्वर बनकर त्यांनी केले तर आभार प्रदर्शन भास्कर सरपते यांनी केले.शेवटी पूज्य भिक्खु धम्मशील थेरो यांनी दिलेल्या आशीर्वाद गाथेने कार्यक्रमाची सांगता झाली.

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१७० दि.२८.०७.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान/श्रीमती नानासाहेब सुधाकर तोतरे रा.गुळज ता.गेवराई जि.बीड** यांनी यांच्या **मुलगां**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | साईराज नानासाहेब तोतरे | मुलगा | ०३.०६.२०२४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०८/ ०८ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१७० दि.२८.०७.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान/श्रीमती हरिभाऊ सिताराम शिकारे रा.लासुरा ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **वडिलां**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सिताराम राधाकिसन शिकारे | वडील | १८.०९.२०२१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलबधता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २४/ ०७ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/४४९**

## कार्यालय नगर परिषद,अंबड

**दिनांक :- ०१/०८/२०२५**

अर्जदार श्री./ :- १.कृष्णा विष्णू मुंढे २.गिता कृष्णा मुंढे प्रकरण :- सर्व्हे नं.-३५ सहान प्लॉट नं.-१९ सिटी सर्व्हे नं.१८६४/अ-२० न.प.मि.नं.१८-१२५-१९ चे हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. ( १८-१२५-१९ ) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला ------------येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा.नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चर्तु:सिमा
पुर्व :- प्लॉट नंबर - १८
पश्चिम :- ०६ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
दक्षिण :- प्लॉट नंबर -२०
उत्तर :- प्लॉट नं.-१९ मधील आजरोजी राम बाबूराव भोसले व इतर १ यांनी खरेदी घेतलेला भाग

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**


# राहुल गांधी निर्मित 'मतांची चोरी' चित्रपट ठाकरे कुटुंबियांनी दिल्लीत जावून पाहिला

## पण, तोही ईव्हीएम सारखा फ्लॉप गेला - भाजप प्रवक्ते राम कुलकर्णी

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

काँग्रेस पक्षाचे नेते राहुल गांधींनी मतांची चोरी या राजकिय चित्रपटाची निर्मिती केल्यानंतर चार दिवसांपूर्वी स्वत:च्याच निवासस्थानी दिल्लीत इंडिया आघाडीच्या सार्या प्रेक्षकांना बोलावुन लॉन्चिंग केलं. चित्रपट पहाण्यासाठी राज्यातून खा.शरदचंद्रजी पवार यांच्यासह उद्धवजी ठाकरे सपत्निक उपस्थित होते. ईव्हीएम मशिन चित्रपट फ्लॉप गेल्यानंतर हा चित्रपट चालेल कदाचित त्यांना वाटलं असेल. आदित्य ठाकरेंनी चित्रपट पहाण्यासाठी मागच्या रांगेत बसलो असं म्हणत मिळालेल्या वागणुकीवर समाधानाचं घोंगडं पांघरून टाकलं. मात्र चित्रपट निर्मात्यांनी सेन्सॉर बोर्डाकडे अर्थात निवडणुक आयोगाकडे लॉन्च करण्यापुर्वी शपथपत्र दिलं नाही यावरूनच चित्रपटाचा महिमा लक्षात घेण्यासारखा अशी टिका भाजपाचे प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी केली.

प्रसिद्धीसाठी दिलेल्या पत्रकात कुलकर्णी यांनी म्हटले की, चार दिवसांपूर्वी दिल्लीत इंडिया आघाडीची बैठक राहुल गांधींच्या निवासस्थानी पार पडली त्यात मतांची चोरी महाराष्ट्रात कशी झाली ? याबाबत पॉवर प्रेझेंटेशन सुरूवातीला उल्लेख केलेल्या चित्रपटाचे लॉन्चिंग केले. तसं पहाता विधानसभा निवडणुकीला महायुती सत्तेवर येवुन वर्षे पुर्णत्वाकडे जात असताना उशिरा शहाणपण का ? हाच मुळात प्रश्न. हे खरं आहे की, निवडणुक निकालानंतर काही दिवस ईव्हीएम मशिनच्या नांवाने संपुर्ण देशात तमाशा केला तो फ्लॉप गेला. आता बिहार विधानसभा निवडणुका आणि स्थानिक स्वराज्य संस्था राज्यात, कदाचित विरोधकांच्या रणनितीचा भाग समजून. मागे वळून पहाताना मुळ शिवसेना बावीस वर्षे भाजपसोबत असताना केंद्र आणि राज्य स्तरावरून भाजपाचे नेते 'मातोश्री' चा सन्मान राजकियदृष्ट्या १०० टक्के करायचे. कार्यक्रम कुठला ही असो पहिल्या रांगेत स्वत: उद्धवजी ठाकरेंचं कुटुंब असायचं. खा.संजय राऊत यांच्यासारखी मंडळी ना.एकनाथ शिंदे कामानिमित्त दिल्ली दौर्यावर गेले तर हीन शब्दाने त्या दौर्याची खिल्ली उडवतात. मग आता मतांची चोरी चित्रपट पहाण्यासाठी संपूर्ण ठाकरे परिवार सोनिया दरबारात तीन दिवस मुक्कामी राहिले हे नसे थोडके. बोलणं सोपं कृती अवघड या उक्तीप्रमाणे कर्माचे भोग ज्याला त्याला भोगावेच लागतात. इंडिया आघाडीच्या



बैठकीत उद्धवजी, युवा नेते आदित्य ठाकरे यांना कुठल्या रांगेत राहूल गांधींनी ठेवलं ? हे संपूर्ण राज्यातील जनतेनं पाहिलं. अगदीच म्हटलं तर ठाकरे शिवसैनिकांना खर्या अर्थाने सहन झालं ही नसेल. त्यावरून बराच गदारोळ महाराष्ट्रात उठला ज्याचा खुलासा आदित्य ठाकरेंनी करताना सागुन टाकलं की, चित्रपट पहातांना मागच्या रांगेत बसावं लागतं. म्हणून कदाचित इंडिया आघाडीच्या चित्रपट ग्राहक मतांची चोरी राहुल गांधी निर्मित चित्रपट प्रदर्शित होताना मागे बसलो कदाचित आत्मानंदाचा भाग असू शकतो. त्याचवेळी भाजपवाले त्यांना किती सन्मान द्यायचे ? याचीही आठवण अनेक भाजपाच्या श्रेष्ठींनी करून दिल्याचाही राम कुलकर्णी यांनी आपल्या पत्रकात म्हटलं. सन्मान जेव्हा सत्तापदासाठी विरळून टाकल्या जातो. त्यावेळी कुणाची ही मानसिकता जिथे जागा मिळेल तिथे बसण्याची असु शकते तो भाग वेगळा. प्रश्न हाच पडतो की, एक वर्षानंतर मतांची चोरी केवळ निवडणुकीच्या तोंडावर राहुल गांधींनी मुद्दा काढला तो म्हणजे सामान्य जनतेत संभ्रम निर्माण करून देण्यासाठी. वास्तविक ज्या विरोधकांनी देशाच्या शुरवीर सैनिकांनी पाकिस्तानला धडा दाखवताना ऑपरेशन सिंदुरचीही खिल्ली उडवली. यांना केवळ विरोधासाठी विरोध म्हणुन राजकारण करायचं यातून हे सिद्ध होतं. निवडणुक आयोगाने ईव्हीएम मशिन असेल किंवा मतांची चोरी याबाबतीत स्पष्टता देवुन ही केवळ राजकियदृष्ट्या बदनाम करण्याची मोहिमच राहुल गांधींनी हाती घेतली. मग हिंमत असेल तर निवडणुक आयोगाकडे शपथपत्राद्वारे तक्रारवजा माहिती का मागत नाहीत ? हा सवाल करून मतांची चोरी १०० टक्के चित्रपट पडला असं कुलकर्णी यांनी आपल्या पत्रकात म्हटलं आहे.



## कमी भक्तीत लवकर प्रसन्न होणारा देव भोळा शंकर - ह.भ.प.गोविंद महाराज पवार

आष्टी (प्रतिनिधी)

मृत्यू लोकातच पुण्य निर्माण करता येते. येथेच पुण्यवंत होता येते. हरिदासाच्या सहवासात राहिले की पुण्य मिळते. हरिदास होऊन मुक्ती मिळविता येते. सुर्य, गणपती, विष्णु, शंकर व आदिशक्ती या पाच भक्तिच्या देवता आहेत. व्यवस्थेला आपण भेद म्हणतो. परमार्थ करण्याची व्यवस्था आहे. त्या व्यवस्थेला भेद मानु नका. विष्णु व शंकराचा भेद करु नका. ते एकमेकांच्या हृदयात असतात.

भक्ती करणाऱ्यांची संख्या वाढल्याने भेद पडु लागला. ज्यांनी उपकार केला त्याची आपकाराणे फेड करु नये. भक्तीभाव न पाहता शंकराने भस्मासुराला वरदान दिले होते. संसार म्हणजे विस्तवाचे अंथरुन आहे. त्या अंथरुनावर कधीच शांत झोप येणार नाही. कमी भक्तीत लवकर प्रसन्न होणारा देव भोळा शंकर आहे असे प्रतिपादन ह. भ. प. गोविंद महाराज पवार यांनी केले.

आष्टी येथील सावतानगर बेलेश्वर महादेव मंदीर आवारात बेलेश्वर सेवा मंडळाच्या वतीने तिसरा श्रावणी सोमवार निमित्त सोमवार दि. ११ आगस्ट २०२५ रोजी आयोजित कीर्तनात ते बोलत होते. पुढे बोलताना ह. भ. प. पवार महाराज म्हणाले की, स्त्रीने केलेले पाप पतीला भोगावे लागते. पुरुषांनी केलेले पुण्य अर्धे पुण्य पत्नीला आपोआप मिळते. पुरुषाने केलेले पाप संपुर्ण पाप पुरुषाला भोगावे लागते असे धर्मशास्रात म्हटलेले आहे.

यावेळी ह. भ. प. दिनकरराव तांदळे महाराज, पत्रकार उत्तम बोडखे, अमोल बळे, आजिनाथ नवले, तुकाराम भोसले, माजी सरपंच आदिकाताई लोखंडे, सौ. विद्या संतोष चव्हाण, सिंधुताई भराडे, हौसराव आजबे, रोहित बडेकर, छगन महाराज कारंडे, गिरी महाराज, संपतराव धोंडे, उत्तम धोंडे, प्रा. सुभाष रासकर, नगरसेवक ज्ञानदेव राऊत, नामदेव तावरे, बलभीम धोंडे, भालेकर महाराज, ग्यानदेव धोंडे, इंजि. पी. बी. बोडखे, राजेंद्र लाड, संदिप धोंडे, एकनाथ धोंडे, अंकल धोंडे, तान्हाजी भगत, विष्णू बोडखे, ह. भ. प. बलभीम धोंडे तर चोपदार साहेबराव ग्यानदेव धोंडे, सुनिल रघुनाथ धोंडे आदि मान्यवर व शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. कीर्तनानंतर भंडारा कार्यक्रम झाला.



## राजा हरिश्चंद्र पिंपरी येथे शिवलिंगार्चन

### रुद्र प्रजन्य सोहळा संपन्न

वडवणी ( प्रतिनिधी)

दिनांक १०/०८/२०२५ रविवार रोजी वडवणी तालुक्यातील प्रसिद्ध असलेले ठिकाण व भारतातील एकमेव असलेले ठिकाण श्री क्षेत्र राजा हरिश्चंद्र पिंपरी येथे श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र दिंडोरी प्रणित वडवणी च्या अंतर्गत श्री राजा हरिचंद्र पिंपरी या पावन नगरीत श्रावणमासा निमित्त परमपूज्य गुरुमाऊलींच्या आशीर्वादाने सामूहिक शिव लिंगार्चन रुद्र प्रजन्य सोहळा श्री राजाहरिचंद्र पिंपरी येथे श्रावण मास निमित्ताने सुपर्जन्यवृष्टी व राष्ट्र कल्याणार्थ हजारो सेवेकरी च्या उपस्थित महादेव च्या शिवलिंग वर रुद्र पाठ, प्रजन्य पठन करुन अभिषेक करण्यात आला.सेवा करण्यात आली.यावेळी वडवणी सह पंचक्रोशीतील सेवेकरी परिवार मोठ्या संख्येने सेवेकरी उपस्थित होते .वं सर्वांनी महाप्रसादाचा लाभ घेतला *श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र वडवणी अंतर्गत श्री राजाहरिचंद्र पिंपरी येथे महाप्रसाद वं शिव लिंगार्चन रुद्र प्रजन्य सेवा संपन्न हजारोच्या संख्येने सेवेकरी उपस्थित संपन्न झाला.यावेळी राजा हरिश्चंद्र चे परिचर श्री स्वामी समर्थ महाराज च्या जपाने गजबजून गेला.

# अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विशेष व्यक्तींचा सन्मान सोहळा संपन्न

### अड गौतम दादा भालेराव मित्र मंडळाचा उपक्रम

वडवणी (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यातील विविध संघटनेतील, व वेगवेगळ्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या, मान्यवरांचा सत्कार अड. गौतम दादा भालेराव मित्र मंडळाच्या वतीने, अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त, नागवंशी बुद्ध विहार वडवणी. या ठिकाणी करण्यात आला आहे.

सविस्तर वृत्त असे की, आज दिनांक १० ऑगस्ट २०२५ रोजी. लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे, यांच्या १०५ व्या जयंतीचे आयोजन, वडवणी या ठिकाणी करण्यात आले होते. यावेळी बीड जिल्ह्यातील विविध पक्ष, विविध संघटना, व विविध क्षेत्रातील विशेष कामगिरी केलेल्या, त्याचबरोबर काही नवीन पदाधिकाऱ्यांच्या निवडी झाल्या, यानिमित्त लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंतीचे निमित्त साधून, मान्यवरांचा सन्मान सोहळा करण्यात आला होता. हे काम अड.गौतम दादा भालेराव मित्र मंडळ बीड जिल्हा यांच्यावतीने करण्यात आलं होत. वडवणी शहरातील नागवंशी बुद्ध विहार, या ठिकाणी दिनांक १० ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी बारा वाजता, या सोहळ्याचे आयोजन




करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ नेते, दयानंद स्वामी हे होते. तर कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते मा. सिद्धार्थभाऊ शिनगारे हे होते. त्याचबरोबर बीड जिल्ह्यातून विविध स्तरातून, मान्यवर उपस्थित झाले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस दादासाहेब मुंडे, वंचित बहुजन आघाडीचे माजी जिल्हाध्यक्ष अनिलजी डोंगरे, दैनिक आरंभचे संपादक दीपक थोरात, एकतावादी रिपाईचे बीड जिल्हाध्यक्ष शैलेंद्रभाऊ पोटभरे, ऑल इंडिया पँथर सेनेचे जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे, वडवणी नगरपंचायतचे सभापती बाबासाहेब वाघमारे, सामाजिक कार्यकर्ते युवराज शिंदे, सामाजिक कार्यकर्ते रावसाहेब राऊत, समाजसेवक तेजस शिंदे सर, बहुजन समाज पार्टीचे जिल्हाध्यक्ष अमोल डोंगरे, मानवी हक्का अभियानचे महादेव उमप,बी एस पी चे माजलगाव विधानसभा अध्यक्ष जालिंदर साळवे, अड. राजेश शिंदे, इत्यादी उपस्थित होते. त्याचबरोबर काही विशेष उपस्थिती पुण्यनगरीचे पत्रकार विनायक जाधव, एस एम न्यूजचे संपादक सतीश मुजमुले, शिवराम तरकसे साहेब, सुभाष साळवे साहेब, आजाद क्रांती सेनेचे महादेव आव्हाड, अमित गोरखे फाउंडेशनचे दशरथ कुचेकर, वंचित बहुजन आघाडीचे अविनाश झोडगे, मानवी हक्क अभियान चे तालुकाध्यक्ष विष्णू बाप्पा मुजमुले, सामाजिक कार्यकर्ते विजय मुजमुले, बहुजन विकास मोर्चाचे बिबीशन डोंगरे, सामाजिक कार्यकर्ते रमेश गवळी, राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार पक्षचे सुग्रीव मुंडे, अड.सचिन अवचार, विलास अवचार, गोर सेनेचे आप्पासाहेब पवार, अर्जुन पवार, विलास गवळी, आप्पाराव मुजमुले, प्रेमानंद मोरे, महादेव भिसे, विकास सोंदरमल, प्रभाकर डोंगरे, अविनाश वडमारे, सुमित धनवे, पप्पू आरे, विजय शिंदे, विशाल पोटभरे, सुभाष साळवे, धनराज खळगे, इत्यादींची विशेष उपस्थिती होती. यावेळी प्रमुख वक्ते सिद्धार्थ शिनगारे यांनी, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारे विविध मुद्द्यांना हात घातला. तर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनाविषयी काही प्रमाणात

# श्रावणात भक्ती, शक्ती आणि निसर्गाचा संगम

## श्रीक्षेत्र नांगरतास येथे भाविक- पर्यटकांची गर्दी

तळणी / बाळु गायकवाड

पांगरी गोसावी जवळील ऐतिहासिक व पौराणिक तीर्थक्षेत्र श्रीक्षेत्र नांगरतास येथे श्रावण महिन्यात भक्ती, शक्ती आणि निसर्गाचा सुंदर संगम पाहायला मिळत आहे. हिरवाईने नटलेलं निसर्गरम्य वातावरण, ओढ्यानाल्यातून खळखळणारे पाणी, पक्ष्यांचा मधुर किलबिलाट आणि भक्तिमय वातावरण यामुळे येथे भाविकांसह पर्यटकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत आहे.स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, महान तपस्वी श्री महंत कामगीरी महाराज यांचे येथे वास्तव्य होते, तर रामगीरी महाराजांनी मंदिराचा जीर्णोद्धार केला. सध्या नांगरतास संस्थानकडे सुमारे १५ एकर जमीन आहे.

**प्रभू श्रीरामांच्या पावन पाऊलखुणा**

आख्यायिकेनुसार, सत्ययुगात प्रभू श्रीरामचंद्र वनवासात असताना नांगरतास येथे काही काळ वास्तव्यास होते. दिल्लीतील 'जहाजहा रामचरण जाई' संस्थेच्या नोंदीनुसार, नांगरतास हे प्रभू श्रीरामांचं वनवासातील १४४ वे स्थान होतं. येथे त्यांनी प्रत्यक्ष नांगर चालवून शेतकऱ्यांना शेतीविषयी सखोल मार्गदर्शन केलं व शेती करण्यास प्रोत्साहन दिलं. आजही त्या नांगराच्या पाऊलखुणा पाहायला मिळतात. त्यावरूनच या ठिकाणाला नांगरतास हे नाव प्राप्त झालं.

**महादेव मंदिराची ऐतिहासिक ओळख**

येथील महादेव मंदिर हेमाडपंथी वास्तुकलेचे दगडी कोरीव काम असलेले सुंदर उदाहरण आहे. आख्यायिकेनुसार, प्रभू श्रीरामचंद्रांनीच महादेव मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली होती. मंदिराचा कायापालट परमपूज्य रामगिरी बाबा यांनी केला व त्यानंतर येथे 'श्रीक्षेत्र नांगरतास संन्याशी आश्रम' स्थापन झाला.

**श्रावणातील धार्मिक सोहळे**

श्रावण महिन्यात संपूर्ण महिनाभर धार्मिक कार्यक्रम, पूजाअर्चा आणि यात्रांचे आयोजन होते. भाविक प्रभू श्रीराम व महादेवाच्या दर्शनासाठी लांबवरून येतात, तर पर्यटक निसर्गसौंदर्याचा मनमुराद आनंद घेण्यासाठी येथे भेट देतात. स्थानिकांच्या मते, हे ठिकाण धार्मिक



श्रद्धास्थानाबरोबरच निसर्गप्रेमींसाठीही स्वर्गसमान आहे.

**सुविधा विकासाची गरज**

श्री महंत भागवतगीरी महाराज म्हणाले की, शासनाने लक्ष देऊन या तीर्थक्षेत्रात सभागृह, स्वच्छतागृह, पार्किंग व पाण्याची सुविधा करावी, जेणेकरून भाविकांना अधिक चांगल्या सोयी मिळतील.

**भंडारा सोहळा उत्साहात**

श्रावण मासानिमित्त सोमवारी (ता. ११ ऑगस्ट) भाजपा मंठा तालुका उपाध्यक्ष शरद पाटील यांनी भंडाऱ्याचे आयोजन केले होते. यावेळी आमदार बबनराव लोणीकर, पोलीस निरीक्षक मनोज कुमार राठोड, भाजपा तालुका अध्यक्ष नितीन राठोड, मंठा नगराध्यक्ष वैजनाथ बोराडे, सरपंच संघटनेचे अध्यक्ष अमोल मोरे, मनोज देशमुख,राजेश मोरे,अंकुश तात्या अवचार, वाघाळा सरपंच सुनील कांगणे , गजानन देशमुख, नितीन सरकटे, गजानन कांगणे यांच्यासह हजारो भाविकांनी प्रसादाचा लाभ घेतला.श्रावणाच्या पवित्र वातावरणात, धबधब्याचा गारवा, निसर्गरम्य सौंदर्य आणि देवदर्शनाचा आनंद लुटण्यासाठी रोजच भाविकांची येथे मोठी रांग लागते आहे.

## अ‍ॅड. सचिन गायकवाड यांच्या पेट्रोल पंपाचे उद्घाटन अँड. चंद्रकांत नवले यांच्या शुभहस्ते संपन्न

बीड ।प्रतिनिधी

बीड नाथापुर रोड नाळवंडी नाका, आदित्य कॉलेज जवळ ड. सचिन राजेंद्र नारायणराव हिरामनजी गायकवाड यांच्या हिंदुस्तान पेट्रोलियम या पेट्रोल पंपाचे उद्घाटन अँड. चंद्रकांत नवले यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. यावेळी शिवसेनेचे माजी शहरप्रमुख तथा न. प. बीड चे माजी सभापती संजय भाऊ नलावडे, शिवसेनेचे माजी उपशहर प्रमुख तथा न. प. बीड चे माजी सभापती शहाजीराव गायकवाड, मानकूर वाडीचे सरपंच माऊली जोगदंड, या कामाचे कॉन्ट्रॅक्टर बबनरावजी बनसोडे साहेब, अभिमानजी शेलार, प्रतापरावजी साहेबराव गायकवाड, उमेश गायकवाड, नितीन गायकवाड, इंजिनीयर राहुलजी अबुज, सोपानरावजी खांडेकर, आसारामजी मुळे मामा, पवन शेटे तसेच परिसरातील इतर मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्य ठिकाणी जिल्हा वाशियांचे सेवेसाठी पेट्रोल पंप उपलब्ध करून दिल्याने उपस्थित सर्व मान्यवरांनी ड. सचिन गायकवाड यांचे स्वागत व कौतुक करून आभार मानले.



## बालरंगभूमी परिषदेतर्फे राबविणार १२ ऑगस्टला 'इतिहास महाराष्ट्राचा'

बीड (प्रतिनिधी)

बालरंगभूमी परिषदेतर्फे 'इतिहास महाराष्ट्राचा' हा उपक्रम संपूर्ण महाराष्ट्रभर राबवला जात असून, बीड जिल्ह्यातील कार्यक्रम १२ ऑगस्ट रोजी होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मोत्सवापासून ते राज्याभिषेक सोहळ्यापर्यंतचा इतिहास नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला, शिल्पकला व वक्तृत्व या विविध कलामाध्यमांतून मंचावर सादर केला जाणार आहे.

या उपक्रमांतर्गत मुलांसाठी इतिहासातील घटनांवर आधारित स्पर्धा घेण्यात येणार असून ती तीन गटांत होईल, दोन एकल गट आणि एक समूह गट. गेवराई, माजलगाव, उमरी आणि बीडमधील अनेक शाळा व वर्गातून बालकलावंत सहभागी होणार आहेत. स्पर्धा सौ. के. एस. के. महाविद्यालयाच्या सभागृहात होईल. कार्यक्रमाचे उद्घाटन निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या हस्ते होईल, तर प्रमुख अतिथी म्हणून नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. योगेश क्षीरसागर उपस्थित राहतील, अशी माहिती बीड बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष डॉ. दीपा क्षीरसागर यांनी दिली. बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष नीलम शिर्के-सामंत यांच्या संकल्पनेतून ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. दिनांक १२ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता सुरू होणाऱ्या या स्पर्धेत सुमारे ३०० ते ३५० बालकलावंत सहभागी होतील. छत्रपती शिवाजी महाराजांचा जाज्वल्य इतिहास विविध कलामाध्यमांतून रसिकांसमोर उभा राहणार आहे. स्पर्धेत प्रथम व द्वितीय क्रमांक मिळवणारे सहा संघ अंतिम फेरीसाठी २३ व २४ ऑगस्ट रोजी मुंबई येथे पाठवले जातील. रसिकांनी या उपक्रमाचा मनसोक्त आनंद घ्यावा, असे आवाहन बीड नाट्य परिषदेच्या अध्यक्ष डॉ. दीपा क्षीरसागर, कार्यवाह डॉ. संजय पाटील देवळाणकर, सहकार्यवाह स्नेहल पाठक, विलास सोनवणे, मिलिंद शिवणीकर, अनिता शिंदे, दुष्यंता रामटेके, अमित गाढे, नामदेव साळुंखे, विजय राख, सिद्धार्थ अग्रवाल, दीपक गिरी, रोहित पुराणिक, असलम शेख, सुरेश साळुंखे, बालासाहेब कांबळे, अनुराधा चिंचोलकर, दीपक जमदाडे, पवन शिंदे व सुरेश थोरात यांनी केले आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# आमदार डॉ.गुट्टे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित आरोग्य शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## शिबिरात १८३५ रुग्णांची झाली तपासणी : तज्ज्ञ डॉक्टरांनी केले औषधोपचार

गंगाखेड (प्रतिनिधी)

शहरातील संत जनाबाई महाविद्यालयाच्या प्रशस्त प्रांगणात आयोजित भव्य दोन दिवसीय आरोग्य शिबिर उत्साहात संपन्न झाले. ग्रामीण व शहरी भागातील गरजू रूग्णांना योग्य औषधोपचार आणि आवश्यक असलेल्या वैद्यकीय सुविधा मोफत उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने स्थानिक आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मुख्यमंत्री सहाय्यता निधी, धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष आणि मातोश्री दगडूबाई गुट्टे प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने हे भव्यदिव्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात ग्रामीण व शहरी भागातील शेकडो नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. तसेच हृदयविकार, मधुमेह, नेत्रविकार, कान-नाक-घसा, हाडांचे विकार, महिलांचे आरोग्य, बालरोग आणि त्वचारोग अशा विविध आजारांसाठी तज्ज्ञ डॉक्टरांकडून १८३५ रुग्णांची तपासणी करण्यात आली.

आरोग्य शिबिराचे आयोजन हे केवळ वैद्यकीय तपासण्या करण्यापुरते मर्यादित नव्हते. तर या शिबिरातून ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांच्या आरोग्याबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी मोलाची मदत झाली. या दोन दिवसीय शिबिरात जनरल मेडिसन, जनरल सर्जरी, अस्थि विकार, बालरोग, हृदयरोग, नेत्रविकार, त्वचाविकार, स्त्री रोग, दंत रोग, कान, नाक आणि घसा विकार अशा विविध आजारांवर योग्य ते उपचार करण्यात आले. तसेच शिबीरात तज्ज्ञ डॉक्टरांची उपस्थिती, मोफत वैद्यकीय तपासण्या, औषधे वाटप व आरोग्यविषयक मार्गदर्शन यामुळे लोकांना केवळ आरोग्यसेवेसह, त्यांच्यात आरोग्याविषयी जागरूकताही निर्माण होण्यास मदत झाली. शिवाय, शिवाय, तज्ज्ञ डॉक्टरांकडून रोग निदान, शिबिरानंतर आवश्यक शस्त्रक्रिया, रक्त व लघवी तपासणी, ईजीसी तपासणी सारख्या आवश्यक सुविधा देण्यात आल्या. त्यामुळे हे शिबिर यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेणारे सर्व डॉक्टर, कर्मचारी, स्वयंसेवक, शासकीय कर्मचारी, आरोग्य विभागाचे अधिकारी, आधिपरिचारीका, अंगणवाडी सेविका, आशासेविका आणि नागरिकांचे आभार मानतो. तसेच ग्रामीण भागातील लोकांना दर्जेदार वैद्यकीय सेवा पुरवणे हे आमचे कर्तव्य आहे आणि भविष्यातही असे उपक्रम सुरू राहतील, असे आश्वासन स्थानिक आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे यांनी दिले.

शिबिरात रुग्णांची प्राथमिक व सखोल तपासणी करून योग्य उपचारपद्धती सुचवण्यात आली. तसेच गरजूंना मोफत औषधांचे वाटप करण्यात आले. शिबिरात आलेल्या प्रत्येक नागरिकाला त्यांच्या आजारानुसार योग्य आरोग्य सल्ला देण्यात आला. या शिबिरातील तज्ज्ञ डॉक्टरांच्या टीममध्ये छ.संभाजीनगर, नांदेड, लातूर, परभणी, पुणेसह विविध ठिकाणांहून आलेले अनुभवी वैद्यकीय अधिकारी सामील झाले होते. त्यामुळे त्यांच्या उपस्थितीमुळे ग्रामीण जनतेला मोठ्या प्रमाणात लाभ झाल्याचे पाहायला मिळाले. विशेष म्हणजे शिबिरात महिलांच्या आरोग्य तपासणीसाठी स्वतंत्र विभाग उभारण्यात आला होता. स्त्रीरोग तज्ज्ञांनी महिलांशी संवाद साधून



त्यांना विविध आरोग्य समस्या, योग्य आहार, लसीकरण आणि तपासण्या याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

शिबिरातील सहभागी रुग्णांना वेळेत व सुलभ पद्धतीने सेवा मिळावी यासाठी चांगली व्यवस्था करण्यात आली होती. तसेच डोळ्यांच्या तपासणीसाठी आलेल्या रुग्णांची दृष्टी तपासणी, मोतीबिंदू निदान, तर हाडांच्या विकारांनी त्रस्त असलेल्या रुग्णांना हाड व सांधेदुखीविषयी योग्य उपचार पद्धती सांगण्यात आल्या. बालरोग तज्ज्ञांनी लहान मुलांच्या पोषणस्थिती, लसीकरण आणि सामान्य आजारांविषयी पालकांना जागरूक केले. तसेच मुलांसाठी स्वतंत्र सल्ला केंद्रही सुरू करण्यात आले होते. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी, धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष आणि मातोश्री दगडूबाई गुट्टे प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी, कर्मचारी, स्वयंसेवक, वैद्यकीय कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

यावेळी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.सदानंद भिसे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.कालिदास निरस, गंगाखेड वैद्यकीय अधीक्षक डॉ.हेमंत मुंडे, पालम वैद्यकीय अधीक्षक डॉ.रमेश खंदारे, पूर्णा वैद्यकीय अधीक्षक डॉ.लक्ष्मण नाईक, गंगाखेड तालुका आरोग्य अधिकारी डॉ.मनोज कुमार दीक्षित, पूर्णा तालुका अधिकारी डॉ.सुरेश गिनगिने, मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे मराठवाडा विभागीय समन्वयक डॉ.पुष्कर महाजन, मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.बालाजी इप्पर, मातोश्री दगडूबाई गुट्टे प्रतिष्ठानचे सचिव ड.मिलिंद क्षीरसागर यांच्यासह गुट्टे काका मित्र मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, आरोग्य विभागाचे कर्मचारी, अंगणवाडी सेविका, आशासेविका, आधिपरिचारिका तसेच मतदारसंघातील गरजू रुग्ण, महिला, पुरुष, युवक, युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते.

...तर खाणे म्हणजे पोट भरणे नव्हे!

शरीरातील योग्य प्रमाणात घटक म्हणजे पिष्टमय, नत्रयुक्त, स्निग्धपदार्थ आणि कमी जीवनसत्त्वे, क्षार व तंतुमय पदार्थ होय. ते सर्व शरीराला त्याच्या गरजेपुरते मिळायला हवेत. त्यांचे प्रमाण कमी पडले तर नुकसान होतेच. पण, जास्त झाले तरी अपाय सुध्दा होतो. शरीराचे पोषण नीट झाले, तर झीज भरून निघेल. तसेच शरीराचे सर्व व्यवहार सुरळीतपणे पार पडण्यासाठी लागणारी ऊर्जा मिळेल. रस, रक्त, अस्थी, मांस, मेद, मज्जा व शुक्र, या सातही धातूंचे पोषण होईल. मानवाला ज्या सहा चींचे ज्ञान होते त्यातील मधुर, तिक्त, आम्ल, लवण, कषाय, कटू या सर्व रसांचे उतरत्या क्रमाने योग्य प्रमाण हवे. म्हणून शरीराचे पोषण नीट होईल, असा आपला आहार ठेवला पाहिजे. आपले खाणे म्हणजे जिभेचे चोचले पुरविणे किंवा पोट भरणे नव्हे, तर तो एक यज्ञ आहे, असेही मत स्थानिक आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे यांनी व्यक्त केले.

# हर घर तिरंगा मोहिमेत मॅरेथॉन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

परभणी ।प्रतिनिधी

हर घर तिरंगा मोहिमेअंतर्गत विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून या मोहिमेतील पहिला उपक्रम म्हणून आज (१० ऑगस्ट) सकाळी खुल्या मॅरेथॉन दौड स्पर्धा उत्साहात पार पडली.ही ६ कि.मी. मॅरेथॉन छत्रपती शिवाजी महाराज पुतळा - कै. वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ कमान - वळसा - पुन्हा छत्रपती शिवाजी महाराज पुतळा - प्रभाग समिती 'ब' या मार्गावर आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेत शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थी, युवक-युवती, नागरिक तसेच महानगरपालिका अधिकारी-कर्मचारी अशा एकूण १२५ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला.सकाळी ७.३० वाजता महानगरपालिकेचे मुख्य लेखा अधिकारी डॉ. प्रभाकर काळदाते यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून स्पर्धेला सुरुवात झाली. यावेळी सहायक आयुक्त आवेज हाश्मी, आस्थापना विभाग प्रमुख शिवाजी सरनाईक, क्रीडा व सांस्कृतिक विभाग प्रमुख राजकुमार जाधव, प्रा. रणजीत काकडे, रामेश्वर कुलकर्णी, श्रीकांत कुरा आणि उमेश जाधव उपस्थित होते.स्पर्धेत आदिनाथ सोळुंके यांनी प्रथम क्रमांक मिळवत ३००० पारितोषिक प्राप्त केले.



सोपान शरद पवार यांनी द्वितीय क्रमांक पटकावून १५०० मिळवले, तर तृतीय क्रमांकासाठी ऋषीकेश बालटकर यांना १००० देण्यात आले. उत्तेजनार्थ पारितोषिक ५०० अर्जुन भाळशंकर यांना मिळाले. विजेत्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. विजेत्यांचे अभिनंदन आयुक्त धैर्यशील जाधव, उपायुक्त बबन गं. तडवी आणि सहायक आयुक्त प्रज्ञावंत कांबळे यांनी केले. स्पर्धेचे पंच म्हणून प्रा. रणजीत काकडे, प्रा. खाजा अब्दुल खदीर, प्रा. डॉ. गुरूदास लोकरे, क्रीडा शिक्षक यमनाजी भाळशंकर, शिवाजी खुणे, अमोल नंद, तुकाराम कल्याणकर आणि सचिन पवार यांनी कार्यभार सांभाळला.

पुढील उपक्रम - तिरंगा इतिहास प्रश्नमंजुषा

११ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता बि. रघुनाथ सभागृह येथे शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी 'तिरंगा इतिहास' विषयावर प्रश्नमंजुषा आयोजित करण्यात आली आहे. प्रत्येक शाळा-महाविद्यालयातून ५ विद्यार्थी सहभागी होऊ शकतात. नावनोंदणी कार्यक्रम स्थळी सकाळी १० ते ११ वाजेपर्यंत केली जाईल. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयुक्त धैर्यशील जाधव यांनी केले आहे.

# परभणी महापालिकेवर भगवा फडकवू : आ. अर्जुन खोतकर

परभणी।प्रतिनिधी

शिवसेना पक्ष हा सर्वसामान्य जनतेच्या सेवेसाठी आहे. आपण घराघरात पोहोचून समस्या सोडवू आणि येणाऱ्या काळात परभणी महानगरपालिकेवर भगवा फडकवू, असा ठाम विश्वास अंदाज समिती प्रमुख तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांनी व्यक्त केला. शिवसेना पक्ष पदाधिकारी यांची बैठक व्यंकटेश मंगल कार्यालयात पार पडली. यावेळी ते बोलत होते. यावेळी पक्षप्रवेश सोहळा उत्साह, जोश आणि एकजुटीच्या वातावरणात पार पडला. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारांनी प्रेरित होऊन, तसेच राज्याचे कार्यक्षम उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विकासदृष्टी, जनहितकारी कामगिरी आणि लोकाभिमुख धोरणांवर विश्वास ठेवून शिवसेना (उबाठा) तसेच इतर पक्षांतील निष्ठावंत कार्यकर्त्यांनी आज मोठ्या संख्येने शिवसेनेत प्रवेश केला.

या पक्षप्रवेश सोहळ्यास अंदाज समिती प्रमुख तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या प्रमुख उपस्थितीत रामदेव ओझा व ओम मित्र मंडळ, सुनील पाचपुंजे व मित्र मंडळ, सचिन पाटील (मा. उपशहर प्रमुख उबाठा) व सहकारी, प्रदीप उर्फ पप्पू वाघमारे, रामभाऊ कुलथे, माधवराव खुणे, कैलास पवार (उपशहर प्रमुख युवा सेना), सय्यद मकसूद अली (अल्पसंख्यांक



प्रमुख), कुसुम पिल्लेवार (महिला शहर प्रमुख), महेश मठपती आणि असंख्य कार्यकर्त्यांनी भगव्या पताकेखाली एकत्र येत जनतेची सेवा करण्याचा संकल्प केला.या सोहळ्यात शिवसेना जिल्हाप्रमुख आनंद भरोसे यांच्या नेतृत्वाचा ठसा स्पष्ट जाणवला. त्यांच्या प्रेरणेतून कार्यकर्त्यांनी शिवसेनेच्या संघटन बळकटीसाठी आपली ताकद एकवटली. नव्याने दाखल झालेल्या शिवसैनिकांनीही शिंदे साहेबांची विकासगती, जनतेशी असलेला थेट संवाद आणि तत्पर तोडगे हीच खरी राजकारणाची दिशा आहे, असे ठामपणे सांगितले.व्यासपीठावर जिल्हाप्रमुख आनंद भरोसे, विशाल कदम, माजी खासदार सुरेश जाधव, माजी आमदार हरिभाऊ लहाने, शिवसेना संपर्कप्रमुख पंडितदादा भुतेकर, राजू कापसे, माणिक पोंढे, बाळासाहेब पानपट्टे, होंगे पाटील, प्रभाकर कदम, केशवराव कदम, गीता सूर्यवंशी, सखुबाई लटपटे, प्रवीण देशमुख, शीलाताई शेटे, कल्पना दळवी, प्रकाश फरकंदकर, शेषराव मोहिते, आप्पाराव वावरे यांसह जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधील पदाधिकारी, महिला आघाडी सदस्य आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवसेनेच्या उबाठा गटातर्फे परभणीत जोरदार निदर्शने



परभणी ।प्रतिनिधी

राज्य सरकारमधील कलंकित भ्रष्ट मंत्र्यांची हाकालपट्टी करावी, या मागणीसाठी शिवसेनेच्या उध्दव बाळासाहेब ठाकरे गटातर्फे सोमवारी येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रविंद्र रामकिशन धर्मे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आयोजित केलेल्या या निदर्शनात शेकडो शिवसैनिक व महिला पदाधिकारी, कार्यकर्त्या सहभागी झाल्य होत्या.

या आंदोलनकर्त्यांनी आंदोलनस्थळी जोरदार घोषणाबाजी करीत संपूर्ण परिसर दणाणून सोडला. सरकारमधील कलंकित व भ्रष्ट मंत्री हे बेताल वक्तव्य करीत आहेत. त्यामुळे सर्वसामान्य शेतकर्यांसह नागरीकांच्या भावनांना ठेच पोहोचते आहे. परंतु, सरकारद्वारे आवाज उठवूनसुध्दा या मंत्र्यांच्या विरोधात काडीमात्र कारवाई होत नाही, हे वास्तव आहे, असे मत शिवसेनेच्या एका शिष्टमंडळाने जिल्हाधिकार्यांना सादर केलेल्या निवेदनाद्वारे केली. दरम्यान, या आंदोलनात महिला जिल्हाप्रमुख सौ अंबिका डहाळे, माजी सभापती गंगाप्रसाद आणेराव, रामनाना खराबे, पंढरीनाथ घुले पाटील, संजय घाडगे, अरविंद देशमुख, बाळासाहेब राखे यांच्यासह अन्य पदाधिकारी सहभागी होते.

# युवा फेडरेशनद्वारे परभणीत जोरदार निदर्शने




## ऑनलाईन जुगार, बेटींग व्यवसायाच्या विरोधात कठोर कारवाईची अपेक्षा

परभणी ।प्रतिनिधी

राज्यातील वाढत्या ऑनलाईन जुगारासह बेटींग व्यवसायाच्या विरोधात अखिल भारतीय युवा फेडरेशनच्या कार्यकर्त्यांनी आवाज उठवावा, अशी मागणी अखिल भारतीय युवा फेडरेशनच्या एका शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

संपूर्ण राज्यासह अन्यत्रसुध्दा इंटरनेट आणि स्मार्ट फोनच्या माध्यमातून ऑनलाईनचा जूगार आणि बेटींग व्यवसाय मोठ्या झपाट्याने वाढतो आहे. तसेच आयपीएल क्रिकेटचे लोण, कॅसिनो गेम्स आणि ॲप्सच्या माध्यमातून लाखो युवक आभासी जगात अडकत आहेत. त्यामुळे त्यांचे कुटूंबिय अक्षरशः अडचणीत आले असून अनेक कुटूंबियांसमोर अनेक प्रश्न उपस्थित राहीले आहेत. या पार्श्वभूमीवर सर्व तालुक्यातील ऑनलाई जुगार, बेटींग व्यवसायाच्या विरोधात पोलिस प्रशासनाद्वारे कठोर कारवाई करणे गरजेचे आहे, असे मत युवा फेडरेशनचे संदीप सोळंके, सय्यद अझहर, प्रसाद गोरे, सतिश मस्के, सुरज आहिरे, शेख मोहसीन, शेख असद, शैलेश निखळ, ओंकार पवार, देविदास खरात, वहिद खान आदींनी व्यक्त केले. तसेच आपल्या विविध मागण्यांसदर्भातील निवेदन सादर केले. दरम्यान, जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी फेडरेशनच्या या मागणीचे निवेदन स्विकारले व सकारात्मक कारवाई करु, असे आश्वासन दिले.

# कावड यात्रेतील दोन भाविकांचा कारने दिलेल्या धडकेने जागीच मृत्यू : पाथरी तालुक्यातील खेडूळा फाट्याजवळील दुर्देवी घटन

परभणी ।प्रतिनिधी

गोदावरी नदीचे पवित्र पाणी घेऊन पहाटे मोठ्या श्रध्देने व मोठ्या जल्लोषात सेलूकडे निघालेल्या कावड यात्रेतील दोघा भाविकांचा एका भरधाव वेगाने धावणार्या कारने दिलेल्या जोरदार धडकेत मृत्यू झाला. तर अन्य चार भाविक जखमी झाले. सोमवार दि. ११ ऑगस्ट रोजी पहाटे पाथरी तालुक्यातील खेडूळा फाट्याजवळ ही दुर्देवी घटना घडली.

सेलू तालुक्यातील काही युवकांसह भाविक १० ऑगस्ट रोजी रत्नेश्वर रामपुरी या गोदावरी काठावरील गावी पोहोचले होते. सोमवारी सकाळी ते गोदावरी नदीचे पवित्र पाणी घेऊन पहाटेच मोठ्या श्रध्देने व जल्लोषात सेलूकडे निघाले तेव्हा सकाळी ५.३० वाजेच्या सुमारास खेडूळा पाटीजवळ एम.एच.०३ सी.एच. १२११ या कारने काही भाविकांना जोरदार धडक दिली. त्यात दोघांचा जागीच मृत्यू झाला तर अन्य चौघे जखमी झाले. प्रत्यक्षदर्शनींनी या घटनेनंतर



जखमींना तात्काळ सेलू येथील रुग्णालयात हलविले, तर काहींना पाथरीत हलविण्यात आले.पाथरी पोलिस ठाण्यातील अधिकार्यांसह कर्मचार्यांनी घटनास्थळी धाव घेतली व दोन्ही मृतदेह ताब्यात घेतले. मृतांमध्ये एकनाथ गजमल (रा. डासाळा) व ऋषिकेश शिंदे (रा. दत्त नगर सेलू) या दोघांचा समावेश आहे.या प्रकरणात संबंधित कार चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होती.दरम्यान, या कारमध्ये चौघेजण होते, ते घटनास्थळावरुन अपघात झाल्या पाठोपाठ पसार झाले. पोलिसांनी त्या कार चालकाचा शोध सुरु केला आहे.

# सुदर्शना फाउंडेशनतर्फे महाराष्ट्र सदन आणि गाझियाबाद पोलीसांना राखी बंधनाने सन्मान





नवी दिल्ली ।प्रतिनिधी

नवी दिल्ली येथील महाराष्ट्र सदन आणि गाझियाबादमधील विजयनगर पोलीस स्टेशन येथे सुदर्शन फाउंडेशनने रक्षाबंधनाच्या पवित्र सणानिमित्त विशेष कार्यक्रम आयोजित केला. या कार्यक्रमात फाउंडेशनच्या अध्यक्ष संयुक्ता देशमुख, कोमल डे आणि निभा श्रीवास्तव यांनी महाराष्ट्र सदनातील सुरक्षा रक्षक आणि विजयनगर पोलीस स्टेशनमधील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना राखी बांधून त्यांचा सन्मान केला.

या कार्यक्रमात महाराष्ट्र सुरक्षा बलाचे अधिकारी श्री. चोरगे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या, तर संयुक्ता देशमुख यांनीही यावेळी उपस्थितांना संबोधित केले.रक्षाबंधनाच्या निमित्ताने सुदर्शन फाउंडेशनने सामाजिक बांधिलकी आणि बंधुभावाचे प्रतीक असलेला अनोखा उपक्रम राबवला. नवी दिल्लीतील महाराष्ट्र सदन येथे कार्यरत असलेल्या सुरक्षा रक्षकांना आणि गाझियाबाद मधील विजयनगर पोलीस स्टेशनमधील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना सुदर्शना फाउंडेशनच्या सदस्यांनी राखी बांधून त्यांच्या सेवेचा सन्मान केला. या उपक्रमात फाउंडेशनच्या अध्यक्ष संयुक्ता देशमुख, कोमल डे आणि निभा श्रीवास्तव यांनी सक्रिय सहभाग घेतला.

या कार्यक्रमात महाराष्ट्र सुरक्षा बलाचे अधिकारी श्री. चोरगे यांनी राखी बांधल्यानंतर आपल्या भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले, हा सण आमच्या कर्तव्यातील समर्पणाला एक वेगळा अर्थ देतो. सुदर्शना फाउंडेशनने आम्हाला राखी बांधून केवळ बंधुभावच नव्हे, तर आमच्या कार्याला मान्यता दिली आहे. त्यांच्या या शब्दांनी उपस्थितांमध्ये उत्साह निर्माण झाला.सुदर्शना फाउंडेशनच्या अध्यक्ष संयुक्ता देशमुख यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. त्या म्हणाल्या, रक्षाबंधन हा केवळ भाऊ-बहिणीच्या नात्याचा सण नसून, समाजातील प्रत्येक व्यक्तीला एकमेकांशी जोडणारा बंध आहे. आमच्या या छोट्याशा प्रयत्नाने सुरक्षा रक्षक आणि पोलीस कर्मचाऱ्यांच्या कार्याला सलाम करायचा होता. त्यांनी फाउंडेशनच्या पुढील सामाजिक उपक्रमांबाबतही माहिती दिली. हा कार्यक्रम महाराष्ट्र सदन आणि विजयनगर पोलीस स्टेशन येथील कर्मचाऱ्यांसाठी एक भावनिक आणि स्मरणीय क्षण ठरला. सुदर्शना फाउंडेशनच्या या उपक्रमाने समाजातील विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या व्यक्तींच्या योगदानाला सन्मान देण्याचा एक अनोखा प्रयत्न केला आहे.

# रक्षाबंधन निमित्त बहिणीला वृक्ष भेट

## सामाजिक कार्यकर्ते विष्णूबाळ झोडगे यांचा अनोखा उपक्रम

बीड ।प्रतिनिधी

रक्षाबंधन निमित्त आपल्या बहिणीला वृक्ष भेट देऊन लागवड करून संगोपन करण्याचे बंधन जोपासत.. बीड जिल्हा प्रशासनाच्या हरित बीड वृक्षरोपणातून समृद्धतेकडे या अभियाना अंतर्गत बीड येथील सामाजिक कार्यकर्ते विष्णूबाळ झोडगे यांच्या पुढाकारातून रक्षाबंधन निमित्त आपल्या बहिणीला वृक्ष भेट देऊन ते वृक्ष जगण्यासाठी प्रयत्न करण्याचा संकल्प करण्यात आला..!

सध्या रक्षाबंधनाचा सण घरोघरी अगदी उत्साहात भाऊ-बहीण साजरी करताना दिसत आहेत, रक्षाबंधनाच्या निमित्ताने भाऊ बहिणीच्या रक्षणाची जबाबदारी अंगावर घेत बहिणीला आयुष्यभर सुखी आयुष्यासाठी सहकार्य करत असतो..!

बहिणीला विविध स्वरूपाच्या भेट वस्तू देऊन हा पवित्र रक्षाबंधनाचा उत्सव साजरा केला जातो त्यातच वृक्षरोपण हा अगदी सलोख्याचा विषय कुणाच्याही मनी येत नाही त्यामुळे एक सामाजिक संदेश देऊन बहिणीच्या हाताने येणाऱ्या पिढीसाठी एक तात्विक असे



उदाहरण म्हणून सामाजिक कार्यकर्ते तथा युवा नेते विष्णूबाळ झोडगे यांनी आपल्या भगिनी अर्चना समाधान कोरडे जरूड येथे यांच्या समवेत दारासमोर जगील अशा स्वरूपातलं एक वृक्ष लावून सामाजिक भावना जपली आहे सध्या जिल्हा प्रशासनाच्या वतीने ही वृक्ष लागवडीसाठी मोहीम राबवली जात आहे.. याच मोहिमेचा एक छोटासा भाग म्हणून त्यांच्या या सामाजिक उपक्रमाला सर्व स्तरातून कौतुकाची थाप मिळत आहे..!

# नागपूर मध्ये तेली सैनेची बैठक उत्साहात संपन्न

## बैठकीत घेतले अनेक धोरणात्मक निर्णय

नागपूर ( प्रतिनिधी ) तेली समाजाच्या विविध सामाजिक उपक्रमांच्या उद्देशाने सामाजिक कार्यकर्ते विलास बुटले यांच्या नागपूर येथील निवासस्थानी महाराष्ट्र राज्य समन्वयक श्री नरेंद्र तराळे सर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. प्रारंभी संतश्री जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात करून सभेला सुरुवात झाली तेली समाजाच्या विविध सामाजिक विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली समाजची दिशा आणि दशा तसेच समाजाचे विविध प्रश्न व महिला व पुरुषांना स्वयंरोजगाराच्या माध्यमातून उद्योग व्यवसाय सुरू करण्यावर भर देण्यात आला हे कार्य तडीस नेण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा तेली सेनेचे विद्यमान राज्य संघटक श्री विलास बुटले यांच्या कडे जबाबदारी देण्यात आली व तेली समाजाची राज्य पातळीवर एक स्वतःची बँक असावी यावरही विचारमंथन करण्यात आले उपस्थितांनी आपापले विचार व्यक्त केले. तेली सेनेच्या माध्यमातून एक मजबूत संघटन करुन सामाजिक कार्याला गती देण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.विदर्भ सचिव संजय देशमुख यांनी तेली सेनेची आगामी वाटचाल व आगामी काळामध्ये होणाऱ्या विविध सामाजिक विषयांवर मार्गदर्शन केलं व होणाऱ्या स्थानिक



स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत तेली समाजाला मोठ्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळावे म्हणून तेली सेनेचे पदाधिकारी हे पेक्षाच्या वरिष्ठांना भेटुन तेली समाज बांधवांना जास्तीत जास्त तिकीट मिळून देण्यासाठी प्रयत्न केला जाईल असे तेली सेनेचे महाराष्ट्र समन्वय श्री नरेंद्र तराळे यांनी सांगितले उत्साही वातावरणामध्ये तेली सेनेचे बैठक संपन्न झाली या महत्त्वपूर्ण बैठकीला तेली सेनेचे महाराष्ट्र समन्वयक नरेंद्र तराळे सर,विदर्भ सचिव संजय देशमुख,अशोक खते,चंद्रशेखर मस्के,सौ.नंदा गिरीपुंजे,सौ.ज्योस्ना चन्ने,सौ.पुजा लाखे,सौ.मीनाक्षी वैरागडे,श्रीमती दुर्गापाठ,सौ.आशा देशमुख,वामनराव नागोसे,डॉ.धनराजजी बारई, अशोकराव खंते,पंकज गुन्हाणे,लक्षणराव सातपूते,श्री हरीहरजी रेवतकर,अनिलराव चन्ने, विलास बुटले,नरेंद्र तराळे,संजय देशमुख,संजय अवचट,जयदेव कामडी,श्री संदीप बुटले,अभिषक बुटले,सौ.सुवर्णा बुटले,सचिन डिवरे,पिंटू चूटे,अजयजी हिगे,समिर श्रीराव,राहूल श्रीराव , आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अशोक खते यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ.बारी यांनी मानले.

# महावितरणच्या विद्युत सुरक्षा अभियानाचे पाच नवीन विक्रम

## एशिया व इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये स्थान

मुंबई ।प्रतिनिधी

शून्य विद्युत अपघातासाठी जनजागृती अभियानातील विविध उपक्रमांत लोकसहभागाचे महावितरणने नवीन पाच विक्रम नोंदवून एशिया बुक ऑफ रेकॉर्ड व इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये स्थान प्राप्त केले आहे. या दोन्ही संस्थांच्या वतीने सोमवारी (दि. ११) पाचही विक्रमाच्या नोंदीचे प्रमाणपत्र व सन्मानपदक प्रदान करून महावितरणचा गौरव करण्यात आला. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या संकल्पनेतून विद्युत सुरक्षा अभियानाचे आयोजन करण्यात आले. या अभियानातील लोकसहभागाची नोंद एशिया बुक ऑफ रेकॉर्डने घेतल्याबद्दल त्यांनी सर्व अभियंते, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात एशिया व इंडिया बुक ऑफ रेकॉर्डच्या परीक्षक कश्मिरा मयंक शाह यांनी विद्युत सुरक्षा अभियानातील लोकसहभागाच्या पाच विक्रमांची घोषणा केली. त्यांनी या दोन्ही संस्थांच्या वतीने संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार, कार्यकारी संचालक श्री. परेश भागवत (मानव संसाधन), श्री. प्रसाद रेशमे (प्रकल्प), सौ. स्वाती व्यवहारे (वित्त) यांना प्रमाणपत्र व सन्मानपदक प्रदान करून



महावितरणचा सन्मान केला. यावेळी एशिया व इंडिया बुक ऑफ रेकॉर्डच्या परीक्षक कश्मिरा शाह यांनी महावितरणच्या पाचही विक्रमांची माहिती दिली. संचालक श्री. राजेंद्र पवार यांनी सांगितले, की ‘लोकसहभागातून शून्य विद्युत अपघात जनजागृती अभियानाला मोठा प्रतिसाद मिळाला. त्यामुळे या अभियानाची व्याप्ती आणखी वाढविण्यात येईल.महावितरणने यंदा २० व्या वर्धापन दिनानिमित्त दि. १ ते ६ जून दरम्यान विद्युत सुरक्षेच्या जनजागृतीसाठी राज्यभरात विविध उपक्रमांचे आयोजन केले होते यात सुरक्षा संदेश देणाऱ्या मॅरेथॉनमध्ये ११ हजार ८८१, ऑनलाइन प्रश्नमंजूषेत ९६ हजार १५०, शालेय निबंध व चित्रकला स्पर्धेत ७ हजार ५९३, विद्युत सुरक्षेच्या रॅलीमध्ये २७ हजार १५५ जण सहभागी झाले होते. तसेच दि. ६ जूनला एकाचवेळी ४२ हजार २०१ जणांनी विद्युत सुरक्षेची शपथ घेतली. यासह महावितरणकडून १ कोटी ९२ लाख ७९ हजार ग्राहकांना नोंदणीकृत मोबाईलवर ‘एसएमएस’द्वारे तर ३५ लाख ७३ हजारांवर ग्राहकांना नोंदणीकृत इमेलद्वारे विद्युत सुरक्षेचा संदेश देण्यात आला. या सर्व उपक्रमांत तब्बल २ लाख ११ हजारांवर नागरिक, शालेय विद्यार्थी, अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला.भारत सरकारकडे नोंदणीकृत व वर्ल्ड रेकॉर्ड युनिव्हर्सिटीशी संलग्न एशिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये आशियातील सर्व प्रमुख राष्ट्रीय बुक ऑफ रेकॉर्ड्सचे परीक्षण करून नोंदी घेतल्या जातात. त्यानुसार महावितरणच्या विद्युत सुरक्षा अभियानामध्ये प्रामुख्याने विद्युत सुरक्षा रॅली, मॅरेथॉन, विद्युत सुरक्षेची शपथ, ऑनलाइन प्रश्नमंजूषा तसेच ‘एसएमएस’ व ‘इमेल’द्वारे ग्राहक संवादामध्ये लोकसहभागाच्या विक्रमांची नोंद केली. त्याची नोंद इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये घेण्यात आली. त्यानंतर या नोंदी एशिया बुक ऑफ रेकॉर्डकडे पाठविण्यात आल्या. त्यांच्याकडून आंतरराष्ट्रीय रेकॉर्ड प्रोटोकॉलनुसार परीक्षण झाल्यानंतर या विक्रमांची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे.कार्यक्रमात कार्यकारी संचालक श्री. परेश भागवत यांनी अभियानाची माहिती दिली. उपकार्यकारी अभियंता डॉ. संतोष पाटणी यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले. कार्यक्रमाला मुख्य अभियंते सर्वश्री मनीष वाठ, दत्तात्रेय बनसोडे, प्रशांत दानोळीकर, हरिश गजबे, वादिराज जहागिरदार, दीपक कुमठेकर, मिलिंद दिग्रसकर, मुख्य महाव्यवस्थापक श्री. भूषण कुलकर्णी, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. संजय ढोके आदींची उपस्थिती होती.

# कारगिल विजय महोत्सवानिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान

## विधानसभा उपाध्यक्ष आमदार अण्णा बनसोडे यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन करण्यात आला गौरव

अनंत जाधव /पुणे

स्वातंत्र्याच्या इतिहासात ‘ऑगस्ट क्रांती दिन’ आणि ‘कारगिल विजय दिन’ हे दोन दिवस भारतीय जनतेच्या मनात सदैव कोरलेले आहेत. याच प्रेरणेतून महाराष्ट्र बुक ऑफ रेकॉर्डस, आझाद फाउंडेशन, टाईम्स ऑफ पुणे आणि सुमीत चौधरी सोशल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांती प्रेरणा पुरस्कार २०२५ हा भव्य सन्मान सोहळा पुण्यातील पंडित जवाहरलाल नेहरू सभागृह, घोले रोड येथे देशभक्तीमय वातावरणात पार पडला.या कार्यक्रमाचा उद्देश केवळ सन्मान करणे नव्हता, तर पुढच्या पिढीपर्यंत कारगिल युद्धातील शौर्यगाथा आणि स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाची प्रेरणा पोहोचवणे हा होता. १९९९ च्या कारगिल युद्धात भारतीय सैन्याने -५०ओ तापमान, १७,००० फूट उंचीवरील रणांगण आणि प्रखर गोळीबारात विजय मिळवला होता. त्या लढाईत ५२७ जवानांनी सर्वोच्च बलिदान दिले, तर हजारो जवान जखमी झाले या त्याग, पराक्रम आणि बलिदानास मानवंदना देण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र विधानसभा उपाध्यक्ष आमदार अण्णा बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी आमदार अण्णा बनसोडे म्हणालेहा सोहळा म्हणजे भूतकाळातील क्रांतीची आठवण, वर्तमानातील देशसेवेचा गौरव आणि भावी पिढीसाठी प्रेरणेचा



अद्वितीय संगम आहे.सोहळ्यात कारगिल युद्धातील वीर, माजी सैनिक, त्यांच्या कुटुंबियांसह समाजसेवक, पत्रकार, शिक्षण, आरोग्य, प्रशासन आणि कलेत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. रामदास मदने (कारगिल युद्ध नायक), कमांडर बलवंत सिंग, दीपक राजे शिर्के (सैनिक सेल प्रदेशाध्यक्ष) अशा सैन्य दलात पराक्रम गाजवलेल्या माजी सैनिकांची प्रमुख उपस्थित या कार्यक्रमाची मुख्य आकर्षण ठरली.

या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे पूर्व शहर अध्यक्ष सुनील टिंगरे, भूमाता ब्रिगेड च्या संस्थापिका तृप्ती ताई देसाई, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे शहर अध्यक्ष प्रशांत जगताप, बहुजन समाज पक्षाचे नेते हुलगेश चलवादी, यांच्या प्रमुख उपस्थित हा सन्मान सोहळा पार पडला.या सोहळ्यात गगनभेदी ‘जय हिंद’च्या घोषणा, देशभक्तिपर गीते आणि विशाल संपूर्ण आरोग्य संस्था तसेच ज्येष्ठ नागरिक नवचैतन्य हास्य मंडळ यांच्या विशेष सादरीकरणांनी वातावरण भारावून गेले.या वेळी संस्थे चे अध्यक्ष आदम सय्यद यांनी सर्व उपस्थित पुरस्कार्थी ,माजी सैनिक,आणि मान्यवरांचे आभार व्यक्त केले, आणि भावना व्यक्त करताना सांगितले कि, कारगिल युद्ध हे भारतीय सैन्याने सर्वात कठीण भौगोलिक व हवामानाच्या परिस्थितीत जिंकलेले अभिमानास्पद युद्ध आहे, भारतीय सैन्य दलाची ताकत आणि शौर्याची दखल संपूर्ण जगाने घेतली, त्या मुळे आपल्या येणाऱ्या पिढीला हि शौर्य गाथा माहित व्हावी म्हणून कारगिल विजय दिवस आपण मोठ्या उत्सहाने साजरा केला पाहिजे.या भव्य कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सुमीत चौधरी, सतीश राठोड, स्नेहा कुलकर्णी, साहिल शेख,





श्री विठ्ठलगड शिक्षण प्रसारक मंडळ सारणी(सां) संचलित

# गुरुनानक प्राथमिक विद्यालयात रक्षाबंधन कार्यक्रम संपन्न झाला

बीड ।प्रतिनिधी

बहीण भावाच्या नात्याचे सांगणारा एक अनोखा भारतीय सण म्हणजे राखी पौर्णिमा. नाते गुंफले हे रेशमी धाग्याने वात्सल्य, आपुलकी अन जिव्हाळ्याने सदैव टिकावे हे बंध नात्याचे. बहीण भावाच्या निर्मळ प्रेमाचे या उक्तीप्रमाणे दरवर्षीप्रमाणे या ही वर्षी शाळेतील सर्व मुलींनी राख्या आणून सर्व मुलांना बांधल्या तसेच सर्व मॅडमनी शाळेतील सर्व शिक्षकांना राख्या बांधल्या. भारताच्या प्राचीन संस्कृतीची ओळख करून देणाऱ्या या सणानिमित्त शाळेतील सर्व मुलांनी राखी बांधून घेतल्यानंतर मुलींना चॉकलेट रुपी ओवाळणी देत रक्षाबंधन साजरे केले.

# सोनगिरीत घेण्यात आलेल्या नेत्र तपासणी शिबिरातील २० रुग्णांवर छत्रपती संभाजीनगर येथे झाली यशस्वी शस्त्रक्रिया

## १७० नेत्र तपासणीतील ३८ झाले होते शस्त्रक्रियेसाठी पात्र



सोनगिरी येथिल नेत्र तपासणी शिबिरातील वीस रुपयांवर छत्रपती संभाजीनगर येथे यशस्वीरित्या शस्त्रक्रिया करण्यात आली यावेळी रुग्णांना प्रमाणपत्र देवून त्यांच्याशी संवाद साधताना रुग्णसेवक विशाल पिंपळे व रोहिणी पिंपळे

प्रतिनिधी :जाफराबाद

जाफराबाद:- तालुक्यातील सोनगिरी येथील रुग्णसेवक विशाल पिंपळे व छत्रपती संभाजी नगरच्या शिवसेना उबाठा गटाच्या महिला जिल्हाधिकारी रोहिणी पिंपळे यांनी २६ जुलै शनिवार रोजी सोनगिरी येथे भव्य येथे नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन केले होते यावेळी सोनगिरी तथा परिसरातील १७० रुग्णांची डोळयांची तपासणी करण्यात यापैकी ३८ रुग्ण शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरले होते तर यातील सोनगिरी येथिल १० व परिसरातील १० अशा २० रुग्णावर छत्रपती संभाजीनगर येथिल लॉयन्स क्लब हॉस्पिटल येथे शिवसेना उबाठा गटाच्या छत्रपती संभाजी नगर जिल्हयाच्या महिला जिल्हा अधिकारी रोहिणी पिंपळे यांच्या माध्यमातून यशस्वीपणे शस्त्रक्रिया करण्यात आली आहे .

या सर्व रुग्णांची प्रकृती ठणठणीत असून सर्व रुग्णांना आपआपल्या घरी सुखरूप पाठविण्यात आले असून त्यांच्यावर डोळ्यांचे पुढील घरगुती उपचार सुरु असल्याची माहिती रुग्णदुत विशाल पिंपळे यांनी दिली तर या शस्त्रक्रिया विनामुल्य करण्यात आल्याचे रोहिणी पिंपळे यांनी सांगितले ..

यावेळी रोहिणी पिंपळे म्हणाल्या की असेल दृष्टी तर विशेष सृष्टी डोळे हे मानवाच्या शरीरातील अवयवांमधील एक सर्वश्रेष्ठ अवयव असून डोळ्यांमुळे आपण अख्ख जग पाहू शकतो .त्यामुळे डोळ्यांनी कमी , अदंक दिसने ते लाल, पिवळसर होने त्यांना खाज येणे , चिभडणे, पाणी गाळणे आशा संबंधित काही व्याधी असल्यास त्या रुग्णांनी डोळयांच्या आजारावर दुर्लक्ष न करता तात्काळ नेत्र चिकित्सांचा सल्ला घ्यावा त्यांची निगा घ्यावी .यापुढील काळातही शरीराच्या विविध व्याधी साठीच्या शिबिराचे आयोजन करण्यात येणार असून शरीर हीच जगातील सर्वात मोठी संपत्ती असून त्याची निगा घेणे हे आपले कर्तव्य आहे त्यामुळे समाजसेवेचा हा वसा अनंतकाळ सुरू राहणार असल्याचे त्यांनी सांगितले . तसेच समाजातील दानशूरांनीही समोर येऊन रुग्ण सेवा करावी व असे समाज उपयोगी उपक्रम राबवावे तसेच तसेच शरीरातील विविध व्याधींनी त्रस्त असलेल्या रुग्णांनी आमच्याशी संपर्क साधावा असे आवाहनही त्यांनी केले . यावेळी शस्त्रक्रिया झालेले रुग्ण, शिवसेना उबाठा गटाचे कार्यकर्ते तथा नेत्र चिकित्सकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती .

# टाकळखोपा गावासाठी स्मशानभूमी विकास निधीची मागणी

तळणी ।प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील टाकळखोपा ग्रामपंचायतीच्या हद्दीतील स्मशानभूमीच्या विकासासाठी जिल्हा नियोजन निधीतून तातडीने मंजुरी देण्याची मागणी सरपंच प्रभाकर बबनराव बोरुडे यांनी जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा नियोजन समितीकडे केली आहे.ग्रामपंचायतीच्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, स्मशानभूमीसाठी गावात राखीव जागा असली तरी कोणत्याही प्रकारच्या मूलभूत सुविधा उपलब्ध नाहीत. त्यामुळे ग्रामस्थांना अंत्यविधी उघड्यावर करण्याची वेळ येते आहे, जे सामाजिक, धार्मिक व मानवी दृष्टिकोनातून वेदनादायक व अपमानास्पद असल्याचे निवेदनात म्हटले आहे.ग्रामपंचायतीने स्मशानभूमीसाठी पक्का चौथरा, शेड व बसण्याची सोय, पक्का अंतर्गत रस्ता, संरक्षक कंपाउंड भिंत, तसेच पाणी व प्रकाशयोजना करण्याची मागणी केली आहे.यापूर्वी गटविकास अधिकारी, मंठा यांच्या मार्फत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचे सरपंचांनी स्पष्ट केले.अंत्यसंस्कार हा प्रत्येकाचा शेवटचा सामाजिक विधी असून, त्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे ही शासनाची नैतिक व कायदेशीर जबाबदारी आहे. त्यामुळे २०२५-२६ च्या योजनेअंतर्गत या कामासाठी निधी तातडीने मंजूर करावा, अशी अपेक्षा सरपंच बोरुडे यांनी व्यक्त केली आहे.

ही मागणीचे पत्र ११ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करण्यात आले असून, प्रत आमदार बबनराव लोणीकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, गटविकास अधिकारी मंठा, तहसीलदार मंठा व पंचायत समिती मुख्याधिकारी यांना देण्यात आली आहे.

# पत्रकार भगिनीचा जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात रक्षा बंधनाचा स्तुत्य उपक्रम



बीड ।प्रतिनिधी

जिव्हाळा शहरी बेघर निवारा केंद्र' येथे दिनांक ९ ऑगस्ट रोजी रक्षाबंधन तसेच संचालकांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी अनाथ बेघर असणाऱ्याना पत्रकार भगिनीने राखी बांधून औक्षण केले. हिंदू समाजात रक्षाबंधन हा सण सर्वजण साजरा करतात. परंतु ज्यांना घर नाही जे अनाथ आहे अशा लोकांबरोबर हा सण साजरा करणे व त्यांचा आनंद द्विगुणित करणे याचे समाधान काही वेगळेच असते.यावेळी अनाथांच्या चेहऱ्यावर जो आनंद ओसंडून वाहत होता तो वेगळाच होता. माणसाने माणूस जोडत चालावा असे प्रतिपादन डी.जी तांदळे (रिटायर्ड प्राचार्य),चाटे सर (रिटायर्ड पोस्ट मास्टर) यांनी केले. यावेळी संस्थेच संचालक, अभिजीत वैद्य, काळजीवाहक छाया सरवदे,संजय तांदळे (ज्येष्ठ पत्रकार), नागरगोजे सर (मुख्याध्यापक), प्राध्यापक पवळ सर आणि पत्रकार ज्योत्स्ना चव्हाण गायकवाड उपस्थित होते. यावेळी अनाथ बेघर असणाऱ्यांना वैष्णव धर्म, माणसाने माणूस जोडत चालणे अशा विविध गोष्टींवर मार्गदर्शन केले. राख्या बांधल्यानंतर सर्वांना मिठाई, केळी व किराणा सामान याचे वाटप करण्यात आले.



# दावरवाडी येथे आदिवासी दिवस साजरा.....!

दावरवाडी ।प्रतिनिधी

दावरवाडी येथील समाज बांधवांनी आदिवासी दिवस मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला त्यावेळी बाहेरून आलेले व गावातील महादेव कोळी बांधव यावेळी उपस्थिती होती प्रथम प्रतिमेला पुष्पहार घालून वंदना करण्यात आली यावेळी उपस्थित कोळी महासंघाचे चंद्रकांत घोडके सरपंच डीडी जाधव कोळी महासंघाचे संतोष मोरे किशोर घोडके गणेश मोरे व सर्व ग्रामपंचायत सदस्य गावातील नागरिक यावेळी उपस्थित होते




# वसंतराव नाईक विद्यालयात सामुदायिक रक्षाबंधन दिवस साजरा

दावरवाडी ।प्रतिनिधी

दिनांक ९ऑगस्ट रोजी वसंतराव नाईक विद्यालयात सामुदायिक रक्षाबंधन दिवस शाळेच्या वतीने साजरा करण्यात आला यावेळी शाळेतील विद्यार्थिनी यांनी शाळेतील शिक्षक व विद्यार्थी यांनी सामुदायिक रक्षाबंधन दीवस हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य मिसाळ सर हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून ज्ञानसागर कोचिंग क्लासेसचे संचालक रेड्डी सर होते

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक जाधव सर यांनी केले. तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्येष्ठ शिक्षक बनसोडे सर यांनी केले तसेच रक्षाबंधनाचे महत्त्व विशद केले व विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन करून दशसूत्री कार्यक्रमांतर्गत संस्कारक्षम विद्यार्थी घडवणे ही काळाची गरज आहे असे विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविले

सर्वप्रथम स्टेज वरील सर्व मान्यवरांना विद्यार्थिनी भगिनींनी औक्षण करून रक्षाबंधन केले व त्यानंतर प्रत्येक विद्यार्थी भगिनींनी आपल्या प्रत्येक विद्यार्थी बांधवांना औक्षण करून रक्षाबंधन केले त्यानंतर शासकीय आदेशाप्रमाणे एक पेड मा के नाम या उपक्रमा अंतर्गत वृक्षांना राखी बांधून रक्षासूत्र या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली ज्ञानसागर कोचिंग क्लासेस पैठण चे संचालक आदरणीय रेड्डी सर यांनी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना गणित या विषयी गेस्ट लेक्चर देऊन विशेष मार्गदर्शन केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राध्यापक कवडे सर प्राध्यापक श्री जाधव सर खिल्लारे सर कानडे सर टूले सर तसेच कर्मचारी विलास चिंचखेडे शमती नरोडे मॅडम यांनी विशेष परिश्रम घेतले



# सिंदफणा प्रकल्प यंदाही ओव्हरफ्लो:नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा, शिरूर तालुक्यातील उन्हाळ्यातील पाणी प्रश्न मिटला

प्रतिनिधी । शिरूर कासार

सिंदफणा प्रकल्प १०० टक्के क्षमतेने भरल्याने नदीपात्रात पाणी सोडण्यात आले आहे. त्यामुळे नदीकाठच्या गावांना प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. मागील दोन दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे प्रकल्पात झपाट्याने पाणीसाठा वाढला. त्यामुळे प्रकल्पातून पाणी विसर्ग सुरू करण्यात आला आहे. मे महिन्यात १९० मिमी पाऊस झाला. एक जून ते ९ ऑगस्टदरम्यान २१२.९ मिमी पावसाची नोंद झाली. यामुळे सिंदफणा प्रकल्पासह इतर प्रकल्पही भरले. मागील पंधरवड्यात प्रकल्प ८० टक्के भरलेला होता. मात्र, या आठवड्यात पावसाचा जोर कायम राहिल्याने प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरला आहे. प्रशासनाने गोमळवाडा, कोळवाडी, शिरूर, ब्रह्मनाथ येळंब, राळेसांगवी, नांदिवली, निमगाव मायंबा, माळेवाडी, हाजीपुर-गाजिपुर, धारवंटा, साक्षाळपिंप्री या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. नागरिकांनी नदीपात्रात जाण्यास मनाई करण्यात आली आहे. खोल भागात राहणाऱ्यांना स्थलांतराचे आदेश देण्यात आले आहेत.तहसीलदार सुरेश घोळवे यांनी प्रकल्पाला भेट दिली पर्यटकांची गर्दी टाळण्यासाठी उपाययोजना सुरू करण्यात आल्या आहेत. नदीपात्रातील पाणीपातळी कधीही वाढू शकते. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन तहसीलदारांनी केले.

# गेवराई तहसीलदारांवर गंभीर आरोप

## अवैध वाळू वाहतूक प्रकरणी जप्त वाहनांच्या लिलावात नियमभंग ३१ ट्रॅक्टर जागेवर कटींग. न करता थेट अखंड स्वरूपात हस्तांतरित!

प्रतिनिधी । गेवराई

बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यात अवैध वाळू वाहतुकीप्रकरणी जप्त केलेल्या वाहनांच्या लिलावात तहसीलदारांनी नियमांचा भंग केल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. लिलाव प्रक्रियेत अनियमितता झाल्याच्या तक्रारींनंतर आता धक्कादायक बाब उघड झाली आहे की, तब्बल ३१ ट्रॅक्टर कटिंग न करता थेट अखंड स्वरूपात लिलावधारकांना हस्तांतरित करण्यात आले. यामागे चिरिमिरी घेऊन तहसीलदारांनी नियम डावलल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या नियमांनुसार, अवैध वाहतुकीत जप्त केलेली वाहने लिलावात भंगार म्हणून कटिंग करूनच देणे बंधनकारक आहे. मात्र, गेवराई तहसीलदारांनी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत संपूर्ण ट्रॅक्टर लिलावधारकांच्या ताब्यात दिल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. यापूर्वीही गेवराईत अवैध वाळू वाहतुकीवरून तहसीलदार संदिप खोमणे यांना जिल्हाधिकारी विवेक जॉनसन यांनी नोटीस बजावली होती. तहसीलदारांनी कारवाईत निष्काळजीपणा दाखवल्याने शासनाचे आर्थिक नुकसान झाल्याचा ठपका ठेवला गेला होता.



स्थानिकांचा आरोप आहे की, तहसीलदारांनी लिलाव प्रक्रियेत गैरव्यवहार करत मोठी रक्कम उकळली. विशेष म्हणजे, जिल्हाधिकारी यांच्याकडून या प्रकरणाकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये संताप आहे. गेवराईत वाळू माफियांवर कारवाई होत असली तरी तहसीलदारांचे हे कृत्य प्रशासनाच्या विश्वासार्हतेवर प्रश्न निर्माण करते. या प्रकरणाची सखोल चौकशी आणि दोषींवर कठोर कारवाईची मागणी जुनेद बागवान यांनी केली आहे.

# ठाणे मॅरेथॉन स्पर्धेत सहभाग घेतलेल्या स्पर्धकाचा घरी गेल्यानंतर मृत्यू

प्रतिनिधी । ठाणे



ठाणे : ठाणे महापालिकेच्या मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी झालेल्या स्पर्धकाचा घरी गेल्यानंतर मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली. बेने देवासी असे त्यांचे नाव असून ते ठाण्यातील वसंत विहार भागातील रहिवासी आहेत. यापूर्वीही अनेक मॅरेथॉन स्पर्धेत त्यांनी सहभाग घेतला होता. त्यांच्या मृत्यूचे नेमके कारण कळू शकले नव्हते. नेहमी आरोग्य सदृढ ठेवण्याकडे कल असलेल्या बेने यांच्या अचानक झालेल्या मृत्यूमुळे हळहळ व्यक्त केली जात आहे. मॅरेथान स्पर्धेत त्यांनी पत्नीसह सहभाग घेतला होता.ठाणे महापालिका आणि ठाणे जिल्हा हौशी थलेटिक्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने ३१ व्या वर्षा मॅरेथॉन स्पर्धेचे रविवार आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत हजारो स्पर्धक सहभागी झाले होते. स्पर्धेची सुरुवात ठाणे महापालिकेच्या पाचपाखाडी येथील मुख्यालयाजवळून झाली. स्पर्धेला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी झेंडा दाखविला होता. त्यानंतर, टप्प्याटप्प्याने एकूण १२ गटातील स्पर्धांचा शुभारंभ महापालिका मुख्यालयासमोरील चौकातून करण्यात आला.कोरोनापासून गेली पाच वर्षे खंडित झालेली ही स्पर्धा यंदा आबालवृद्धांचा सहभाग होता. यावेळी सहभागी धावपटूंचा उत्साह पाहून मॅरेथॉनला झेंडा दाखवल्यानंतर स्वत: उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही मॅरेथॉनमध्ये धावले. त्यांनी धावपटूंसमवेत काही अंतर सहभागी झाले होते.अन् मृत्यू झाला या स्पर्धेत वसंत विहार भागात राहणाऱ्या बेने यांनी देखील त्यांच्या पत्नीसह सहभाग घेतला होता. २१ किलोमीटर स्पर्धेत धावल्यानंतर ते घरी गेले होते. परंतु घरी आल्यानंतर काहीवेळाने ते कोसळले. त्यानंतर त्यांना मृत घोषित करण्यात आले. बेने हे नेहमी विविध मॅरेथॉन स्पर्धांमध्ये सहभाग घेत होते. तसेच,आरोग्य सदृढ असण्याकडे त्यांचा कल होता. अचानक त्यांचा मृत्यू झाल्याचे आश्चर्य होत असल्याचे त्यांच्या परिचयातील व्यक्तींनी सांगितले.